



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे | * अंक ११३ | * नांदेड | * बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६ | * पृष्ठे ६ | * किंमत २ रुपये | ☎: 255777, Fax :252211


# भाजपकडून विधानपरिषदेसाठी ५ नावे जाहीर

## ▶ प्रज्ञा सातव यांना संधी ▶ हिंगोली जिल्ह्याला राज्यसभेपाठोपाठ विधानपरिषदही!

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचं लक्ष लागलेल्या विधानपरिषद निवडणुकांच्या उमेदवारांपैकी पहिल्यांदा भाजपकडून ५ नावांची घोषणा झाली आहे. भाजपच्या संसदीय कमिटीच्या मान्यतेनंतर भाजपने अधिकृतपणे महाराष्ट्रातील ५ विधानपरिषदांच्या जागेसाठी पाच नावांची घोषणा केली. त्यामध्ये, काँग्रेसमधून भाजपात आलेल्या प्रज्ञा सातव यांना पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. तर, अहिल्यानगरमधील विवेक कोल्हेंना संधी विधानपरिषदेची संधी मिळाली आहे. सुनिल कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजपकडून हिंगोली जिल्ह्याला राज्यसभेपाठोपाठ अपेक्षेप्रमाणे विधानपरिषदेतही संधी देण्यात आली आहे.

विवेक कोल्हे यांचं नाव निश्चित झाल्याच्या चर्चा सुरु होत्या. विवेक कोल्हे यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. प्रमोद जठार हे सिंधुदुर्गमधील भाजप नेते असून त्यांना भाजपकडून संधी देण्यात आली आहे.

भाजपने जाहीर केलेल्या ५ नावांमध्ये माधवी नाईक यांचंही नाव असून त्या अनेक वर्षांपासून भाजप संघटनेत काम करतात. तर, संजय भेंडे भाजपचे उपाध्यक्ष असून ते नागपूर भाजपचे जिल्हाध्यक्ष राहिले आहेत. तसेच, प्रमोद जठार यांनाही भाजपने संधी दिली असून जठार हे कोकणातील भाजपचे महत्त्वाचे नेते आहेत. कोकणावर अन्याय होत असल्याची भावना भरुन काढण्याचा प्रयत्न भाजपकडून या उमेदवारीच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

कोल्हे परिवाराचे नगर जिल्ह्यात वर्चस्व मानले जाते. विवेक कोल्हे हे ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांचे नातू तर माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे चिरंजीव आहेत. अहिल्यानगरमधील कोपरगावात काळे-कोल्हे असा जुना संघर्ष आहे. विधानसभा निवडणुकीवेळी आशुतोष काळे यांना राष्ट्रवादी काँग्रेसने कोपरगावमधून संधी दिल्यानंतर भाजपकडून कोल्हे यांना महायुतीचा धर्म पाळण्याचे आवाहन केले होते. विवेक कोल्हे यांनी सोमवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. वाढदिवसानिमित्ताने ही भेट घेतली असल्याची सूत्रांची माहिती होती.

नागपूरचे संजय भेंडे भाजपचे अनेक वर्षांपासूनचे कार्यकर्ते आहे. सध्या ते भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष आहेत. यापूर्वी त्यांनी जिल्हा स्तरापासून भाजपच्या संघटनेत अनेक पद भूषविली आहेत. नागपूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये ते नेहमीच नितीन गडकरी यांचे निवडणूक प्रमुख राहिले आहे. याशिवाय ते सहकार चळवळीतही सक्रीय असून नागपूर नागरी सहकारी बँकेचे संचालक राहिले आहे. भाजपने यंदा विधानपरिषदेची संधी देत त्यांच्या पक्षाप्रती कार्याचा सन्मान केला आहे.

काँग्रेसच्या विधानपरिषदेच्या आमदारकीचा राजीनामा देत प्रज्ञा सातव भाजपमध्ये दाखल झाल्या होत्या. त्यांच्या रिक्त जागेवर भाजपने त्यांना उमेदवारी दिली आहे.

# इराणचा नवा शांतता प्रस्ताव; युद्ध, नाकेबंदी थांबवल्यास होर्मुझ खुली करण्याची तयारी



**तेहरान (वृत्तसंस्था)–** अमेरिकेने युद्ध थांबवले आणि इराणी बंदरांची केलेली नाकेबंदी हटवली तर आम्ही होर्मुझची सामुद्रधुनी खुली करू, असा प्रस्ताव इराणने अमेरिकेपुढे ठेवला आहे. त्याचवेळी अणुकार्यक्रमावर नंतरच्या टप्प्यात चर्चा करू असेही इराणने सुचवले आहे. या चर्चेची माहिती असलेल्या इराणच्या दोन अधिकाऱ्यांनी यासंबंधी माहिती दिली.

इराण-पाकिस्तानच्या चर्चेत इराणने हा प्रस्ताव सादर केला. तो पाकिस्तानतर्फे अमेरिकेला पाठवण्यात आला असून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प तो स्वीकारण्याची शक्यता कमी आहे. अमेरिकेने युद्धसमाप्तीसाठी होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याबरोबरच इराणच्या अणुकार्यक्रमावरही आग्रही भूमिका घेतली आहे.

अमेरिका आणि इराणमध्ये सध्या युद्धविराम आहे. मात्र, अमेरिकी नौदलाने इराणच्या बंदरांची नाकेबंदी केल्यामुळे इराणला आपल्या तेलाची विक्री करणे कठीण जात असून त्यामुळे त्या देशावरील आर्थिक ताण आणखी वाढला आहे. दुसरीकडे इराणनेही होर्मुझची सामुद्रधुनी पूर्ण बंद केली आहे. जगातील २० टक्के कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक तेथून होते.

# प. बंगालमध्ये आज विधानसभेसाठी दुसऱ्या टप्प्यातील मतदान

**कोलकाता (प्रतिनिधी)–** पश्चिम बंगालमध्ये २९ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात पश्चिम बंगालच्या उत्तरेकडील भागासाठी २३ एप्रिल रोजी मतदान झाले होते. आता औद्योगिक पट्ट्यांचे प्रमाण व लोकसंख्येची घनता अधिक असलेल्या पश्चिम बंगालच्या दक्षिणेकडील भागात मतदान पार पडणार आहे. तृणमूल काँग्रेस व भारतीय जनता पक्षात मुख्य लढत होत आहे. २०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत डावे पक्ष व काँग्रेसची चांगलीच पीछेहाट झाली. परंतु, या पक्षांनी घेतलेल्या मतांनी मात्र महत्वाची भूमिका बजावली होती.

संयुक्त मोर्चाच्या मतांचा टक्का विजयाच्या फरकापेक्षा अधिक असलेल्या ११७ मतदारसंघांपैकी ५४ जागांवर दुसऱ्या टप्प्यात मतदान होत आहे. यामध्ये दक्षिण बंगालचा औद्योगिक पट्टा समाविष्ट असून यात कोलकाता, हावडा, हुगळी, उत्तर आणि दक्षिण २४ परगणा आणि बर्धमान व मेदिनीपूरच्या काही भागांचा समावेश आहे. हे भौगोलिक क्षेत्र महत्त्वाचे आहे. पहिल्या टप्प्यात उत्तर बंगाल, जंगलमहल आणि सीमावर्ती जिल्ह्यांत मतदान पार पडले होते, तिथे ध्रुवीकरणाचे राजकारण मोठ्या प्रमाणात झाले होते. त्याउलट, दुसऱ्या टप्प्यात निवडणूक दाट वस्ती असलेल्या शहरांमध्ये आणि औद्योगिक पट्ट्यांमध्ये होणार आहे. या भागात डाव्या पक्षांशी संबंधित कामगार संघटना आणि कार्यकर्त्यांचे प्रमाण अधिक आहे. तसेच नागरी प्रशासन, रोजगार आणि स्थानिक भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांनी हा भाग प्रभावित राहतो. त्यामुळे हे विषय डाव्यांच्या राजकारणाला साजेसे आहेत आणि त्याचाच फायदा घेण्याचा ते प्रयत्न करत आहेत.

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, २०२१ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, लेफ्ट फ्रंट आणि इंडियन सेक्युलर फ्रंट (आयएसएफ) यांच्या संयुक्त मोर्चाला फक्त एक जागा जिंकता आली होती. तरीही ११७ मतदारसंघांमध्ये त्यांच्या मतांचा टक्का विजयाच्या फरकापेक्षा अधिक होता. ही संख्या २९४ सदस्यांच्या विधानसभेच्या एकूण जागांपैकी जवळपास ४० टक्के आहे. ११७ जागांपैकी ७४ जागांवर तृणमूल काँग्रेसचा विजय झाला, तर ४३ जागांवर भाजपला यश मिळाले होते.

# जिल्ह्यातील नागरिकांनी जास्तीत जास्त स्व-गणना करावी –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताची जनगणना-२०२७ ही पहिली डिजिटल जनगणना लवकरच सुरू होणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी येत्या १ ते १५ मे पर्यंत स्व-गणना करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. जिल्ह्यातील प्राचार्य, गटशिक्षणाधिकारी, एनएसएस व एनसीसीचे समुपदेशक यांची बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली




आज जिल्हा नियोजन भवन येथे संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

स्व-गणनेची माहिती se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर १ ते १५ मे २०२६ पर्यंत भरता येईल. नोंदणी केलेली संपूर्ण माहिती ही गोपनीय राहणार असून स्व-गणनेत नांदेड जिल्हा प्रथम येईल, अशा पद्धतीने सर्वांनी स्व-गणनेचे नियोजन करुन जास्तीत जास्त स्वगणना करावी, असेही आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर एकनाथ शिंदेंनी बोलावली तातडीची बैठक

**मुंबई (प्रतिनिधी)–** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेची बैठक बोलावली आहे. या बैठकीत विविध मुद्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. एकनाथ शिंदे यांनी ही बैठक आज दि. २९ एप्रिल रोजी सायंकाळी बोलावलेली आहे. त्यामुळं त्याच बैठकीत विधानपरिषद निवडणुकीसाठी शिवसेनेच्या दोन उमेदवारांच्या नावांबाबत अंतिम निर्णय होऊ शकतो. या बैठकीत पक्षातील नाराजी, पक्षातील नेत्यांची वक्तव्य याबाबत एकनाथ शिंदे भूमिका स्पष्ट करणार असल्याची माहिती देखील देण्यात आली आहे. शिंदेंच्या बैठकीत संजय गायकवाड यांच्या वक्तव्यांबाबत देखील चर्चा होण्याची शक्यता आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेची विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीला पक्षाचे नेते, उपनेते, महत्वाचे लोकप्रतिनिधी आणि प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती असेल. शिवसेनेची बैठक उद्या संध्याकाळी नंदनवन या निवासस्थानी होणार आहे. आज होणाऱ्या बैठकीत विधान परिषद निवडणूक या हा विषय केंद्रस्थानी असेल.

महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्य ९ जागांसाठी निवडणूक झाली आहे, तर एका जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. विधानसभेतील सदस्यांच्या संख्याबळानुसार शिवसेनेच्या वाट्याला दोन जागा येणार आहे. शिवसेनेकडे ५७ जागा असून सेनेच्या दोन जागा निवडून येऊ शकतात. यामुळं उद्याच्या बैठकीत एकनाथ शिंदे काय भूमिका घेतात आणि कोणाला संधी देतात याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

विधानपरिषद निवडणुकीसाठी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून नीलम गोऱ्हे आणि बच्चू कडू यांच्या नावांची चर्चा सुरु होती. नीलम गोऱ्हे यांच्या नावाला विरोध करणारं पुण्यातील महिलाचं एक पत्र व्हायरल झालं होतं. तर, बच्चू कडू यांना संधी द्यायची असल्यास त्यांच्या प्रहार जनशक्ती पार्टीचं शिवसेनेत विलिनीकरण करुन घ्यावं, अशी भूमिका शिवसेनेतील काही नेत्यांनी घेतली होती.

दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील आमदार संजय गायकवाड सातत्यानं वेगवेगळ्या कारणांमुळं वादात आहेत. काही महिन्यांपूर्वी आमदार निवासामधील कॅन्टिनमधील कर्मचाऱ्यांना दमदाटी केल्यानं ते वादात अडकले होते. तर, काही दिवसांपूर्वी संजय गायकवाड यांनी कोल्हापूरमधील प्रशांत अंबी यांना फोन करुन वादग्रस्त वक्तव्य केली होती. त्यामुळं संजय गायकवाड यांच्यासह एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेवर टीका झाली होती.

# १ मेपासून एलपीजीसाठी ओटीपी अनिवार्य

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम आशियातील तणावामुळे जागतिक स्तरावर तेल आणि गॅसच्या पुरवठ्याला मोठा फटका बसला आहे. यामुळे सरकारने देशांतर्गत एलपीजी वितरण प्रणाली आणखी कडक केली आहे. एलपीजी पुरवठ्याच्या नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. येत्या १ मे पासून एलपीजी ग्राहकांसाठी हे नवीन नियम लागू होतील. आता सिलेंडरच्या वितरणावेळी ओटीपी अनिवार्य आहे. ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर मिळालेला ओटीपी डिलिव्हरी एजंटला सांगावा लागेल.

# विदर्भात उष्णतेची लाट

**नागपूर (प्रतिनिधी)–** पूर्व विदर्भासह गडचिरोली जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट कायम असून तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. मागील दोन ते तीन दिवसांपासून तापमानाचा पारा ४२ ते ४७ अंश सेल्सिअसदरम्यान पोहोचला असून, गडचिरोलीतही ४२ अंश तापमानाची नोंद झाली आहे. उकाड्यामुळे दुपारच्या वेळेत जनजीवन विस्कळीत झाले असून, गडचिरोली-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरही वाहतूक कमी झाल्याचे चित्र दिसत आहे. नेहमी गजबजलेला हा महामार्ग दुपारी जवळपास निर्मनुष्य दिसत असून, अत्यावश्यक कामासाठीच काही प्रवासी बाहेर पडताना दिसत आहेत. उष्णतेच्या तीव्रतेमुळे नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# नांदेड उत्तरमध्ये अतिक्रमणावर बुलडोजर; मोर चौक ते छत्रपती चौक परिसर मोकळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** उत्तर विभागाचे अतिक्रमण पथक प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारताच दत्ता कल्याणकर यांनी अतिक्रमणविरोधी धडक कारवाईचा सपाटा लावला आहे. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने मोर चौक ते छत्रपती चौक परिसरातील अंबिका मंगल कार्यालयापर्यंत मुख्य रस्ते व फुटपाथवरील अतिक्रमणे हटवून प्रभावी कारवाई केली.

महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, सहायक आयुक्त रावण सोनसळे यांच्या आदेशानुसार उत्तर विभागाचे पथक प्रमुख दत्ता कल्याणकर यांनी ही मोहीम राबविली. यावेळी जेसीबीच्या सहाय्याने अनेक ठिकाणी रस्त्यांवर व पदपथांवर केलेले अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात आले. कारवाईदरम्यान फेरीवाले, अनाधिकृत स्टॉल, रस्त्यावर



ठेवण्यात आलेले साहित्य तसेच वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांवर बुलडोझर फिरवण्यात आला.

नांदेड शहरात दिवसेंदिवस वाढणाऱ्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनत चालली असून नागरिकांकडून वारंवार तक्रारी येत होत्या. विशेषतः मोर चौक ते छत्रपती चौक या मुख्य मार्गावरील अतिक्रमणामुळे वाहनधारक व पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने ही मोहीम हाती घेतली.

सार्वजनिक रस्ते व फुटपाथवर दुकाने अथवा साहित्य ठेवू नये, अन्यथा पुढील काळात कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे. या मोहिमेत शहर वाहतूक शाखा वजिराबादचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे, टोईंग वाहनासह पोलीस कर्मचारी घाडगे, ढगे, केंद्रे, आडे तसेच भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई शांततेत पार पडली.


महापालिकेच्या या धडक कारवाईमुळे शहरातील मुख्य रस्ते मोकळे होऊन वाहतुकीला दिलासा मिळाला असून नागरिकांकडून या मोहिमेचे स्वागत होत आहे. आगामी काळातही अतिक्रमणाविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# लातूर जिल्ह्यात उष्माघाताचा चौथा बळी; ७५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू

**लातूर (प्रतिनिधी)–** लातूर जिल्ह्यातही मे महिन्याच्या सुरुवातीआधीच उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असून आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे ७५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून उष्माघाताने त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात उष्माघातामुळे मृतांचा आकडा आता चारवर पोहोचला आहे.

मृत शेतकऱ्याचे नाव त्र्यंबक नारायण बेळंबे असे असून दुपारी साडेबारा ते एकच्या सुमारास ते स्वतःच्या शेतात जनावरांसाठी चारा कापत असताना अचानक त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले. त्यांना तात्काळ पानचिंचोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यापूर्वी जिल्ह्यात उष्माघातामुळे मृत्यू झाल्याच्या तीन घटना समोर आल्या होत्या.

औसा तालुक्यातील एरंडी गावात २५ वर्षीय महेश लिंबाजी इंगोले या तरुणाचा शेतातील कामावरून घरी आल्यानंतर चक्कर येऊन मृत्यू झाला होता. तर, औसा तालुक्यातील गोंद्री येथे नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. आणखी एका घटनेत औराद शहाजनी येथे ६० वर्षीय शेतकऱ्याचाही प्रखर उन्हामुळे मृत्यू झाला होता.




# शहरातील मटका अड्ड्यावर पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाची धाड; १३ जणांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरात मटका अड्ड्यावर पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने धाड टाकली आहे. या धाडीत १३ आरोपींविरूद्ध कारवाई करण्यात आली असून ९२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नांदेड परिक्षेत्रात कार्यरत असलेल्या अवैध व्यवसायविरोधी पथकास, नांदेड शहरातील पोलीस ठाणे वजिराबाद हद्दीत मटका सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती.

सदर माहितीवरून दि. २८ एप्रिल रोजी पथकाने नांदेड शहरातील कलामंदिर बसस्थानकाचे बाजूस एका शेडमध्ये छापा टाकला असता, सदर ठिकाणी मटका खेळताना ९ इसम मिळून आले. यातील सर्व इसमांना ताब्यात घेऊन, तपासणी दरम्यान, त्यांच्याकडून ३७ हजार ६००



रुपयांची रोकड, २६ हजार ५०० रुपयांचे (७) मोबाईल व २८ हजार रुपयांचे संगणक असा एकूण ९२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर पथकाने ताब्यातील इसमांना मटका मालकांबाबत विचारपुस केली असता, त्यांनी सदर मटक्याचे मालक हे कमल यादव (रा. दिलीपसिंह कॉलनी, नांदेड), अन्वर शेख (रा.समीराबाग, खडकपुरा, नांदेड), माधव भुसेवाड (रा. शिवशक्तीनगर, मिलरोड, नांदेड) व राजेश शर्मा (रा. कलामंदिर, नांदेड) हे असल्याचे सांगितले. सदर मटका खेळणारे व मटका मालकांविरुध्द वजिराबाद पोलीस ठाणे येथे गुरनं २०४/२०२६ कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास वजिराबाद पोलीस ठाण्यातील पोहेकॉ गणपत शेळके यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ संजीव जिंकलवाड, पोकॉ गणेश धुमाळ व पोकॉ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

# गुजरातच्या सर्व १५ महानगरपालिकांत कमळ; काँग्रेस-आपचा सुपडा साफ

**अहमदाबाद (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्षाने २०२६ च्या गुजरात महानगरपालिका निवडणुकीत पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. राज्यातील सर्व १५ महानगरपालिका जागांचे निकाल जाहीर झाले असून, भाजपाने सर्व जागा जिंकून मोठे यश संपादन केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत काँग्रेस आणि केजरीवालांच्या आपचा सुपडा साफ झाला आहे. तर, या विजयामुळे भाजपाने गुजरातमध्ये त्यांनी संघटनात्मक बांधणी आणि ताकद अजूनही मजबूत असल्याचे दाखवून दिले आहे.

गुजरात महानगरपालिकांच्या समोर आलेल्या निकालांनुसार, अहमदाबाद महानगरपालिकेत, भारतीय जनता पक्षाने १९२ पैकी १५८ जागा जिंकून पालिकेवर मजबूत पकड असल्याचे दाखवून दिले आहे. इथं काँग्रेसला केवळ २२ जागांवर विजय मिळवता आला. राजकोट महानगरपालिकेच्या भाजपाने ७२ पैकी ६५ जागा जिंकल्या, तर काँग्रेसला केवळ सात जागांवर समाधान मानावे लागले.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आजही कुपोषण चालूच?

मेळघाटात नुकतेच कुपोषणामुळे ९२ बालकांचा मृत्यू झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे, पण याबाबत शासन पुरेसे गंभीर असल्याचे कुठे दिसत नाही. कुपोषणाची समस्या केवळ आपल्या देशात आहे असे नाही तर अनेक अप्रगत देशांमध्ये ही समस्या भेडसावत आहे. तथापि आपल्या देशामध्ये जेथे अन्नधान्य सुरक्षा कायदा आहे त्या ठिकाणी कुपोषणाने बालकं मरावीत ही बाब नक्कीच गंभीर आहे. संपूर्ण जगामध्ये, लाखो पालक आणि कुटुंबे पौष्टिक आणि वैविध्यपूर्ण अन्न पुरवण्यासाठी धडपडत आहेत जे लहान मुलांना त्यांच्या पूर्ण क्षमतेनुसार वाढण्यास, विकसित करण्यासाठी आणि शिकण्यासाठी आवश्यक आहेत. वाढती असमानता, संघर्ष आणि हवामानातील संकटे, अन्नधान्याच्या वाढत्या किमती, अन्नपदार्थांची कमतरता, हानिकारक अन्न पुरवठा आणि गरीब मुलांना आहार देण्याच्या पद्धती यामुळे निषेध केला जात आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या बालपोषण अहवालात बाल अन्न कमतरतेची व्याख्या करण्यात आली आहे. मुलांच्या आहारातील विविधता स्कोअर मोजण्यासाठी युनीसेफ आणि जागतिक आरोग्य संघटनेद्वारे विकसित केलेल्या निर्देशांकानुसार जगभरातील देशांना याबाबत दर्जा दिला आहे. अहवालात असे दिसून आले आहे की, जागतिक स्तरावर पाच वर्षांखालील १८१ दशलक्ष मुले (२९%) तीव्र अन्न दारिद्र्यात राहतात. अत्यंत खराब आहारावर जगणाऱ्या मुलांची टक्केवारी बेलारूसमध्ये १% ते सोमालियामध्ये ६३% आहे. भारतात हा आकडा ४०% आहे. या अहवालामुळे गंभीर चिंता निर्माण झाली पाहिजे. कुपोषणाचा परिणाम जगभरातील मुलांच्या आरोग्यावर, विशेषतः भारतात गरिबी हे पोषणाच्या कमतरतेचे मुख्य कारण असले तरी ते गरीब आणि गरीब नसलेल्या दोन्ही कुटुंबांमध्ये दिसून येते. नेहमीच खराब आहारामुळे कुपोषण होते असे नाही. अपुऱ्या आहार पद्धती आणि आहाराचे वातावरण हे देखील परिस्थिती कठीण करणारे घटक आहेत. युनिसेफने बाल अन्न दारिद्र्य म्हणजे मुलांची जीवनाच्या पहिल्या पाच वर्षांत पौष्टिक आणि वैविध्यपूर्ण आहारात प्रवेश करण्याची आणि वापरण्यात असमर्थता म्हणून परिभाषित केले आहे. अहवालात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, कौटुंबिक उत्पन्न हे मुलांच्या पोषण स्थितीचे मुख्य निर्धारक नसते. त्यात म्हटले आहे की, तीव्र अन्न गरिबीचा सामना करणारी निम्म्याहून अधिक मुले तुलनेने श्रीमंत घरांमध्ये राहतात. पुरेशा पोषणासाठी मूलभूत अन्नाची उपलब्धता पुरेशी नाही. खराब आहार पद्धती आणि आहाराचे वातावरण आणि स्वस्त अस्वास्थ्यकर अन्न यांची पोषण अभावामध्ये भूमिका आहे. संघर्ष, हवामान संकट आणि आर्थिक विषमता यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. अन्नधान्याच्या चढ्या किमतींमुळे पौष्टिक अन्नही अनेकांना परवडत नाही. आरोग्यविषयक गरजांबद्दल कमी जागरूकता या गोष्टींचा सामना करत भारताला या स्कोअरवर अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. कुटुंबांना आणि मुलांना अन्न मिळण्याची खात्री करण्यासाठी प्रथम गरिबीच्या समस्या सोडवल्या पाहिजेत. स्त्रिया, अर्भकं आणि बालकांना लक्ष्य करणाऱ्या विद्यमान सरकारी योजना देखील त्यांनी गरजूंना पुरेशा प्रमाणात पोषण पुरवले पाहिजेत. दुसरं आव्हान आहे ते अधिक चांगले काम करणाऱ्या विभागांना शिक्षित करणे तसेच पुरेसा पोषण कसा द्यायचा यावर विचार करणे आवश्यक आहे.

# पारंपरिक बियाणे : संवर्धनाची आव्हाने

मानवी शरीरावरील विविध क्लिनिकल चाचण्यांवरून हे स्पष्ट झाले आहे की, आपल्या आरोग्यसेवासंबंधी आव्हाने सातत्याने वाढत आहेत. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती सतत कमी होत आहे. यामागे अनेक कारणे आहेत. पण सर्वात मोठे आणि मुख्य कारण म्हणजे अनैसर्गिक आणि कीटकनाशकांच्या मदतीने तयार होणारे अन्न. देशात राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी शेतीच्या कामासाठी सुनियोजित कार्यक्रम आखले गेले नाहीत. परिणामी, अन्न उत्पादनाचा दृष्टीकोन विशिष्ट होण्याऐवजी सामान्य बनला. ग्रामीण आत्मनिर्भरतेच्या संकल्पनेला तडा जाऊ लागला. ग्रामीण लोक मोठ्या संख्येने शहरे आणि महानगरांमध्ये स्थलांतरित झाले. पण प्रत्येकाला अन्नाची गरज ही नैसर्गिक गरज आहे. त्यामुळे, या मोठ्या प्रमाणातल्या लोकसंख्येच्या शहरांमधील स्थलांतरामुळे सरकारला विविध मार्गाने पिकांचे उत्पादन वाढवणे भाग पडले.



नैसर्गिक आणि सेंद्रिय पद्धतीने ताबडतोब आणि मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढवण्यासाठी फायदेशीर वातावरण नसल्यामुळे पिकातील कीटकांचा नाश करून पिकातून जास्तीत जास्त अन्नधान्य निर्माण करण्याच्या उद्देशाने कीटकनाशकांचा वापर वाढू लागला. त्यामुळे उत्पन्न वाढले, अन्नधान्यही वाढले, परंतु अशा अन्नामुळे मानवी शरीरही रोगग्रस्त झाले. अर्थात ही प्रक्रिया तीन दशके जुनी आहे. आता कीटकनाशके बनवणाऱ्या बड्या कंपन्यांचा दबदबा वाढला आहे. केवळ भांडवली धोरणांमुळे पिकांसाठी कीटकनाशके तयार केली जात आहेत. नैसर्गिक शेती करण्याचा आणि लोकांचे आरोग्य सुधारण्याचा संकल्प केलेल्या लोकशाही संस्थांचे कीटकनाशक उत्पादक कंपन्यांवर प्रभावी नियंत्रण नाही. अनैसर्गिक शेती करणे ही प्रदीर्घ काळापासून व्यावहारिक प्रथा बनत गेली आहे.

पारंपरिक बियाणे संवर्धन, लागवड आणि सेंद्रिय स्वरूपात अन्नधान्य उत्पादनाचे उपक्रम भारतासारख्या देशात अत्यंत मर्यादित प्रमाणात केले जात आहेत. केवळ श्रीमंत लोकच या प्रकारची कृषी उत्पादने खरेदी करू शकतात. अशा परिस्थितीत कीटकनाशके मारलेल्या अन्नधान्याचे उत्पादन, वितरण आणि वापर वाढत आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. लोकांना विचित्र आजारांनी घेरले आहे. या आजारांच्या निदानासाठी त्वरित उपचार किंवा औषध उपलब्ध नाही. जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्नधान्य शुद्ध आणि नैसर्गिक स्वरूपात नसताना सामान्य माणूस काय करू शकतो? काहीच नाही. त्याला आर्थिकदृष्ट्या परवडणारेही नाही. या स्थितीत शेतीशी संबंधित नवीन धोरणे तयार करून त्यांची ठोस अंमलबजावणी करण्याची मोठी जबाबदारी सरकारवर आली आहे. सध्याच्या केंद्र सरकारने या दिशेने महत्त्वाची पावले उचलली असली, तरी त्याचे सकारात्मक आणि अपेक्षित परिणाम दिसून यायला बराच कालावधी लागणार आहे.

अन्नधान्य शुद्ध असण्यासाठी बियाणे आणि खते त्याची ही पहिली गरज आहे. जीएम पद्धतीमुळे पिकांची बियाणे कमी उपयोगी व अधिक विकारग्रस्त झाले आहेत. जीएम म्हणजेच जेनेटिकली मॉडिफाड. जे बियाणे अनुवांशिक स्वरूप, गुणवत्ता आणि परिणामाच्या दृष्टीने योग्य होते आणि ज्यात नैसर्गिक स्वरुपात कोणताही मोठा विकार नसतो, ते बियाणे अनुवांशिक अनैसर्गिक बदल ($GM^2$) प्रक्रियेतून गेल्यानंतर ते पौष्टिक, शक्तीहीन आणि विकृत बनत गेले. हे सगळे व्हायला अडीच ते तीन दशकांचा प्रदीर्घ काळ लोटला आहे. मात्र बियाण्यांच्या जनुकशास्त्र बदलण्याच्या या प्रक्रियेत मूळ, नैसर्गिक आणि जुन्या बियांचे संवर्धन झाले नाही. देशात काही सरकारी, निमशासकीय, महामंडळांच्या मदतीने बियाणे संरक्षणाच्या काही पद्धती विकसित केल्या जात आहेत, परंतु भारतातील संपूर्ण कृषी व्यवस्थेला नैसर्गिक शेतीच्या मार्गावर आणण्यासाठी त्या पुरेशा नाहीत. वास्तविक पारंपारिक बियाणे संवर्धनाच्या दिशेने प्रयत्न आणि कार्य केले पाहिजे जसे की सर्वोत्तम विक्री होणारे FMCG म्हणजेच 'फास्ट मुव्हिंग कन्झ्युमर प्रॉडक्ट' बनवण्यापासून ते विक्रीपर्यंत आणि मुख्य म्हणजे असे प्रयत्न आणि कृती सरकारच्या पातळीवर जास्त व्हायला हव्यात. तरच बियाणे संवर्धनातील आव्हानांना तोंड देता येईल.

भारत सरकारच्या कृषी सहकार व शेतकरी कल्याण विभागांतर्गत कार्यरत नॅशनल सीड कॉर्पोरेशन लिमिटेड या कामात गुंतलेली असली, तरीही बियाण्यांवर अनैसर्गिक प्रयोग करण्याची प्रवृत्ती नियंत्रणात नाही, आणि पारंपरिक बियाणांचे संवर्धन आणि साठवण हा उद्देश ग्राउंड लेव्हलला प्रभावीपणे साध्य होताना दिसत नाही. नॅशनल सीड्स कॉर्पोरेशन लिमिटेड ही संपूर्णपणे भारत सरकारच्या मालकीची आहे. पारंपरिक आणि अस्सल बियाणे तयार करण्याच्या उद्देशाने १९६३ मध्ये त्याची स्थापना करण्यात आली. महामंडळ सध्या त्यांच्या स्वत:च्या शेतात आणि देशभरातील ११,६०३ नोंदणीकृत बियाणे उत्पादकांमार्फत सुमारे ५६७ जातींच्या ७८ पिकांच्या प्रमाणित बियाण्यांचे उत्पादन करत आहे. २०२१-२२ या आर्थिक वर्षात महामंडळाचा एकूण महसूल ९१५.७२ कोटी रुपये होता. महामंडळाची अकरा क्षेत्रीय कार्यालये आहेत. २२,००० हेक्टर पाच शेती क्षेत्र आहेत. इतकेच नव्हे तर, त्याचे भारतभर अठ्ठेचाळीस प्रादेशिक कार्यालये/उप-युनिट्स, तीस बियाणे उत्पादन केंद्रे, १०७ विपणन केंद्रे, ७६ बियाणे प्रक्रिया प्रकल्प, सात वातानुकूलित बियाणे साठवण सुविधा, दोन भाजीपाला बियाणे पॅकिंग केंद्रे आणि एक डीएनए फिंगर प्रिंटिंग प्रयोगशाळा आहे. भारत. अठ्ठेचाळीस प्रादेशिक कार्यालये/उप-युनिट्स, तीस बियाणे उत्पादन केंद्रे, १०७ विपणन केंद्रे, ७६ बियाणे प्रक्रिया प्रकल्प, सात वातानुकूलित बियाणे साठवण सुविधा, दोन भाजीपाला बियाणे पॅकिंग केंद्रे आणि एक डीएनए फिंगर प्रिंटिंग प्रयोगशाळा आहे.

केवळ नॅशनल सीड्स कॉर्पोरेशन लिमिटेडच नव्हे तर केंद्रीय कृषी मंत्रालयाव्यतिरिक्त राज्यांच्या कृषी विभागांनीही पिकांचे उत्पादन प्रत्येक दृष्टिकोनातून पोषक, दर्जेदार आणि आरोग्यदायी बनवण्यासाठी अनेक धोरणे तयार केली आहेत. मात्र धोरणांच्या अंमलबजावणीत गुंतलेली कार्यकारी यंत्रणा भ्रष्टाचारात गुंतलेली आहे. त्यामुळे अशा यंत्रणेच्या निष्काळजीपणाचा फायदा पिकाशी संबंधित कीटकनाशक कंपन्या घेतात. भाजीपाला, डाळी, तृणधान्ये, भरड धान्य, फळे एवढेच नव्हे तर मसाल्यांच्या उत्पादनातही नैसर्गिक ताकद उरलेली नाही. प्रत्येक प्रकारच्या उत्पादनातील नैसर्गिक पौष्टिकता, चव, गंध, रंग, इतर सर्व गुण संपले आहेत. उदाहरणार्थ, तांदळाच्या उपलब्ध बहुतेक जाती लांब स्वरूपाच्या, कोरड्या आणि पौष्टिक सार नसलेल्या आहेत. भातामध्ये सत्त्वच शिल्लक राहिलेले नाही. तांदळाचे पारंपारिक बियाणे पांढरे असते आणि त्यावर ललंगी धारी किंवा पट्टे असतात. पण आता ही भाताची जात अजिबातच दिसत नाही.

तसेच इतर पिकांचे बियाणेदेखील पारंपरिक स्वरूपात टिकलेले नाही. सरकारला या दिशेने गंभीर आणि क्रांतिकारी धोरणे आखून त्यांची ठोस आणि सुरळीत अंमलबजावणी सुनिश्चित करावी लागेल. खेड्यापाड्यात शेतीची उपलब्धता न झाल्यामुळे शेती अल्पभूधारकांपुरतीच मर्यादित राहिल्याने आणि जुन्या पिढीतील शेतकऱ्यांनी त्यांच्या नवीन पिढीकडे पारंपरिक बियाणे आधारित शेतीचे व्यावहारिक ज्ञान हस्तांतरित न केल्यामुळे तसेच अशा विविध कारणांमुळे आज कृषी क्षेत्र पूर्णपणे बदलले असून त्याला आधुनिक आणि व्यावसायिक स्वरूप आले आहे. या कारणास्तव, पारंपारिक बियाणे संवर्धनासाठी सरकारचे प्रयत्न निष्फळ ठरत आहेत. यावरून असे दिसते की नॅशनल सीड्स कॉर्पोरेशन लिमिटेडच्या नेतृत्वाखाली पारंपारिक बियाणे संवर्धनाचे कागदी घोडे नाचवले जात आहेत, प्रत्यक्षात ग्राउंड लेव्हलला कामगिरी सुमार आहे. या अनुभवाच्या संदर्भात सांगायचे तर देशातील मोठ्या लोकसंख्येला सेंद्रिय आणि नैसर्गिक अन्नधान्याचा अन्नपुरवठा होऊ शकत नाही हे कटू सत्यही आहे.

याचे कारण असे की, पारंपरिक बियाणे संरक्षणाच्या प्रक्रियेनंतर देशात जे काही सेंद्रिय आणि नैसर्गिक उत्पादन तयार केले जाते, ते अधिक मूल्य मिळावे या हेतूने निर्यात केले जाते किंवा देशातील श्रीमंत वर्गच अशा उत्पादनांची खरेदी करू शकतो. परिणामी, देशातील मोठ्या लोकसंख्येला अनैसर्गिक, कृत्रिम आणि पौष्टिकतेची कमतरता असलेले अन्नधान्य खरेदी करून खावे लागते. प्रत्येक नागरिकाला पौष्टिक, नैसर्गिक, सेंद्रिय आणि भेसळविरहित अन्नधान्य अव्याहत मिळण्यासाठी पहिल्यांदा लोकसंख्या नियंत्रणात आणण्याची गरज आहे. देशाच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवल्यास केवळ अन्नधान्याचा अपेक्षित पुरवठाच नाही तर अनेक सार्वजनिक गरजा आणि सुविधादेखील सहज उपलब्ध होतील.

**–मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# मायबापाच्या सेवेतून परिणामकारक निष्पत्ती



मायबाप देवच असतात. ते आपल्याला जन्माला घालतात. म्हणूनच आपल्याला जग बघता येतं. त्यांनी जर जन्मच दिला नाहीतर आपल्याला जगही पाहता येणार नाही आणि त्याचबरोबर देव, धर्मही हे निर्विवाद सत्य आहे. मायबाप आहेत म्हणून आपण आहोत. मायबाप नसते तर आपणही नसतो हेही तेवढंच खरं.

आज स्पर्धाकाळ आहे. या स्पर्धाकाळात आपल्याला नोकरीची अत्यंत आवश्यकता आहे. तेही गलेलठ्ठ नोकरीची. कारण आजच्या परिस्थितीत तुटपुंज्या वेतनात काहीच भागत नाही. म्हणून आपण गलेलठ्ठ वेतनाची नोकरी शोधत असतो. मग अशी नोकरी जिथं मिळेल तिथं आपण जात असतो आणि आपले पोट भरीत असतो. मग त्यात आपला देश का असेना किंवा विदेश का असेना. आपला देश असा की, ज्या देशात माणुसकी आहे. माणुसकी आजही टिकून आहे. आजही आपल्या देशानं माणुसकी सोडलेली नसून आजही आपल्या देशातील लोकं आबालवृद्धांची सेवा करतात. त्यातच मायबापाचीही सेवा करतात. परंतू काही काही महाभाग आजही असे आहेत की, जे मायबापांच्या पोटातून जन्म घेतात. त्यांचे उपकार घेतात. लहानाचे मोठे होतात. प्रसंगी सरकारी नोकरीवर लागतात. परंतु ते उपकार विसरतात व त्या उपकारावर कोणी काही बोलल्यास त्याला अपशब्द बोलतात वा अपमान करतात. आज बरेच असे महाभाग आहेत की, जे सरकारी नोकरीवर मोठ्या पदावर आहेत. ते मोठ्या पदावर माय-बापामुळंच गेलेले असून ते उपकार विसरल्याचे निदर्शनास येत आहे. जेव्हा त्यांचे मायबाप म्हातारे झाले, तेव्हा अशा बऱ्याच जणांनी माणुसकी विकून आपल्या मायबापाला वृद्धाश्रमात टाकलेले आहे. हे वृद्धाश्रमातील भेटीदरम्यान दिसून येते. याबाबत एक प्रसंग सांगतो.

प्रसंग असा, यावेळेस अक्षयतृतीयाचा पर्व पार पडला. त्यात एक पोस्ट आली. कशाला आज मायबापांना पुजताय? मथितार्थ असा मायबाप जीवंत होते तेव्हा ज्यांनी सेवा केली नाही. त्यांना मायबापाचे पुजन करण्याचा अधिकार नाही. वास्तविक ही पोस्ट बरोबर होती. ज्यांनी मायबापाची सेवाच केली नाही आपल्या संबंध आयुष्यात, त्यांना सेवेचा अधिकार कशाला? परंतु या पोस्टवर अनेक प्रतिक्रिया आल्या. त्यात कशाला अशा पोस्ट करताय? असाच हेतू होता साऱ्या लोकांचा. बहुतेक तो नोकरीवर असलेल्यांचाच ग्रुप असावा. ज्यांचे मायबाप त्यांच्याजवळ नसावे आणि ज्यांनी आपल्या नोकरीसाठी आपल्याच मायबापांना वृद्धाश्रमात टाकलेलं असावं. होय नोकरी करणाऱ्या मंडळींची हीच गत आहे. जिथं नोकरी करणारी मंडळी आपल्या मुलांनाच दाईकडं सोपवून त्या नोकरीवर जातात. तिथं ती दाई आपल्या मुलांसोबत कसला व्यवहार करते याकडेही ही मंडळी ढुंकून पाहात नाही. ती काय मायबापांना सांभाळणार उतार वयात.

याबाबत एक बहात्तर वर्षाचा व्यक्तीला विचारलं, काका, आपली मुलं दिसत नाहीत. कुठं आहेत? त्यावर तो दुःखी अंतःकरणानं म्हणाला, मी विनाकारणच शिकवलं माझ्या मुलाला. माझी दोन्ही मुलं आज विदेशात स्थायीक झालेली आहेत. ते इथं येत नाहीत. जास्त पैसा कमवतात ना. त्यावर मी पुन्हा म्हटलं, तुम्ही त्यांच्याकडे का राहात नाही? पोषत नाहीत का ते? त्यावर ते म्हणाले, पोषतात. परंतु आम्हास तिथं करमत नाही. आजारी पडतो आम्ही. तेथील वातावरण आम्हाला लाभदायक होत नाही. मग कशाला ओझं व्हायचं मुलांवर? मला वाटतं की मी फालतूच शिकवली मुलं. नसती शिकवली तर ती मुलं आजही माझ्याजवळच राहिली असती. म्हातारपण मोठं भारी. म्हाताऱ्यांची ही कैफियत. बरीच अशी म्हातारी मंडळी मिळतात आणि आपल्या आटलेल्या वेदना सांगत असतात. याबाबत अनेक किस्सेही प्रसिद्ध आहेत. एका शेतकऱ्यांची गोष्ट सांगतो. या शेतकऱ्यानं आपल्या मुलाला शिकवलं. तो मोठा ऑफिसर बनला. त्यानंतर मुलगा ऑफिसर बनताच त्याचा शेतकरी बाप त्याला भेटायला गेला. जेव्हा तो भेटायला गेला. तेव्हा भेटीदरम्यान तिथं सभा चाललेली होती. विचारलं, 'कोण हे?' उत्तर मिळालं, 'माझ्या घरचा नोकर.'

जन्म दिलेला बाप. त्या मुलांना वाढवतांना भोगलेल्या वेदना. उन्हातून सावलीत नेतांना झालेल्या अडचणी. कधी पीक होईना, तरीही शिक्षणात खंड पडू दिला नाही. सारेच प्रॉब्लेम. तरीही त्या शेतकऱ्यानं आपल्या मुलाला शिकवलं. त्या शेतकऱ्याचा तो अपमानच होत होता. अतिशय लाज वाटत होती आपल्या लेकराची. परंतु काय करणार. उपाय नव्हताच. शेवटी तो निराश होवून घरी परत आला. पुन्हा मुलाच्या घरी कधीही न जाण्यासाठी. खरी परीक्षा मुलांची असते मायबापाच्या म्हातारपणीच. ती कशी वागतात? आपल्याला सांभाळतात का? की आपल्या दुर्दशा करतात. ती चांगली जर निपजली तर सारंच मिळवलं व ती चांगली निघाली नाही तर सारंच गमावलं. याबाबत एक प्रसंग पुन्हा आहे. त्या शेतकऱ्यासारखाच तो प्रसंग. परंतु अपमान करणारा नाही. अलिकडेच एक पोस्ट व्हायरल होत आहे. फरक एवढाच की तो शेतकरी नाही. तो मजूर आहे. तो मजूरही तसाच त्या मुलाला भेटायला गेला. तेव्हा त्याच्या जिल्हाधिकारी पदावर असलेल्या मुलानं त्याला आपल्या खुर्चीवर बसवलं व त्याचा आदरसत्कार करुन त्याचं स्वागत केलं. त्याचा व्हीडीओ बनवून तो व्हायरल केला. असे असावेत ऑफिसर. आपल्या मायबापांना न विसरणारे. आपल्या मायबापांचा यथोचित सन्मान करणारे अन् आपल्या मायबापाच्या उपकारांची जाणीव ठेवणारे. अलिकडे याच प्रकाराची वानवा आहे. लोकं आपल्या मुलांना शिकवतात. त्यांनी आपल्या पायावर उभं राहावं म्हणून. ते आपल्या पायावर उभे राहतातच. परंतु ज्यावेळेस ते आपल्या पायावर उभे राहतात. तेव्हा ते केलेले उपकार विसरुन गेलेले असतात.

आज मुलांनी असला व्यवहार करु नये मायबापासोबत. ते होते म्हणून आपल्याला जग पाहता आलं. ते तेवढंच सत्य आहे. त्यांनी आपल्या रक्ताचं पाणी करुन शिकवलं आपल्याला आणि आपण आज ते रक्तच विसरलो तर आपल्या जगण्याला काहीच अर्थ उरत नाही. तसंच त्यांची सेवा न करता आपण देवधर्म कितीही पुजले तरी ते पुण्य ठरत नाही. मायबापाची सेवा हीच इश्वरसेवा आहे. ते होते म्हणून आपल्या देव कळला. देवाचा आकार कळला. ते जर नसते तर आपला जन्मही झाला नसता, आपल्याला देवही कळला नसता व देवाचा आकारही. बरेचशी अशी लेकरं आहेत की, मायबाप जीवंत असतात, तेव्हा किंचीतही सेवा करीत नाहीत आणि ते नसल्यावर त्यांची सोनेरी रंगात भव्यदिव्य फोटो बनवतात. अशी फोटो बनवतात की जी सुबक व सुंदर असते. सारखी पाहाविशी वाटते. तसेच ते महाभाग आपल्या मायबापाला आपल्या मायबापाची सेवा न करता ते मरण पावल्यावर त्यांची दरवर्षी नित्यनेमानं पितृमोक्ष अमावस्या व अक्षयतृतीयेला पूजा करीत असतात. खरंच याला काय म्हणावे? दिखाऊपणा की आत्मीयता. याबाबत काही बोलल्यास नक्कीच राग येतो अशा उभययंतांना. हा दिखावाच असतो. त्यात आत्मीयता नसतेच. लोकांनी आपल्याला नावबोटं ठेवू नये म्हणून. म्हणतात की ती प्रथा आहे. मग मायबापाची सेवा करणं ही प्रथा नाही का? काही काही मायबाप तर मायबापाच्या मृत्यूनंतर भिंतीवर त्यांची आठवण म्हणून फोटोही लावत नाहीत.

महत्वाचं म्हणजे काही काही लोकं असेही असतात की, जे आपल्या स्वतःच्या मायबापाची सेवा करीत नाहीत. परंतु इतरांची जास्त सेवा करतात. परंतु कोणाची वा इतरांची सेवा नाही केली एकदाची तरी चालेल, ज्यानं जन्म दिला त्या मायबापाची सेवा करावी. त्यांच्या सेवेनच सातजन्माचं पुण्य लाभतं. जो सेवा करेल, तो मेवा खाईल या वृत्तीप्रमाणे ती सेवा केल्यास असं पुण्य लाभतं की, त्या पुण्यातून आपण सदैव सुखी होतो. आपलं आयुष्यही सुखदायक होतं आणि आपल्याला आजार-पाजार होत नाहीत. पर्यायानं सांगायचं झाल्यास आपण आपलं व आपल्या मुलाबाळाचं आयुष्य त्या पुण्यानं मंगलमय बनवू शकतो हे तेवढंच खरं आहे.

**–अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# ट्रम्प यांच्यावरील संशयास्पद हल्ला

२५ एप्रिलच्या रात्री व्हाईट हाऊसचे वार्तांकन करणाऱ्या जगभरातील पत्रकारांसाठी हॉटेल हिल्टन येथे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. या स्नेहभोजनाच्या कार्यक्रमात डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. कॅलिफोर्नियातील थॉमस लन या ३१ वर्षीय तरुणाने त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. सुदैवाने ते हल्ल्यात वाचले या हल्ल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या हल्ल्यानंतर जगातील सर्वात सुरक्षित व्यक्ती म्हणून समजल्या जाणाऱ्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षा व्यवस्थेत असलेल्या त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत मी पुन्हा एकदा म्हणतोय कारण ट्रम्प यांच्यावर झालेला हा पहिला जीवघेणा हल्ला नाही.



यापूर्वी आठ वेळा ट्रम्प यांच्यावर असा जीवघेणा हल्ला झाला आहे. अर्थात प्रत्येक वेळी ते हल्लतून सुखरूप बचावतात त्यामुळे हे हल्ले डोनाल्ड ट्रम्प स्वतःच घडवून आणतात अशी चर्चा अमेरिकन प्रसारमाध्यमात आहे. ज्या ज्या वेळी डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात जनमत तयार होते किंवा त्यांची लोकप्रियता कमी होते त्या त्या वेळी त्यांच्यावर असा जीवघेणा हल्ला होतो हा एक अजब योगायोग आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पहिला हल्ला ते निवडणुकीच्या प्रचार करताना झाला. ज्यावेळी त्यांच्यावर हल्ला झाला त्यावेळी निवडणूक सर्वेमध्ये ते पिछाडीवर पडले होते. त्यांच्यावर हल्ला झाल्यानंतर त्यांना प्रचंड सहानुभूती मिळाली व त्यानंतर त्यांनी निवडणूक मोठ्या मताधिक्याने जिंकली. जिंकून आल्यावर त्यांनी अनेक निर्णय घेतले त्यातले बरेचसे निर्णय जनतेला पसंत पडले नाही. त्यांच्या निर्णयाविरोधात अमेरिकन जनता रस्त्यावर उतरली त्यांची लोकप्रियताही कमी झाली. ज्या वेळी त्यांची लोकप्रियता कमी झाली आणि त्यांच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरली नेमके त्याचवेळी त्यांच्यावर हल्ला झाला. आताही त्यांची लोकप्रियता कमालीची ढासळली आहे. त्यांनी इराणवर ज्या प्रकारे हल्ला केला तो अमेरिकेन जनतेला आवडलेला नाही. इराणवर हल्ला केल्या नंतर इराणने ज्या पद्धतीने प्रतिहल्ला केला त्यावरून अमेरिकेची जगभरात नाचक्की झाली. ट्रम्प यांच्यामुळेच अमेरिकेची जगभरात नाचक्की झाली असे म्हणत अमेरिकन जनता ट्रम्प यांच्या विरोधात रस्त्यावर उतरली. रस्त्यावर उतरून करोडो लोकांनी त्यांचा निषेध केला. सध्या डोनाल्ड ट्रम्प यांची लोकप्रियताही कमालीची ढासळली आहे आणि नेमक्या याच वेळेस हा हल्ला झाल्याने लोक या हल्ल्याविषयी शंका घेत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हे जगातील सर्वात शक्तिशाली व्यक्ती आहे. त्यांची सुरक्षाव्यवस्था उच्चकोटीची असते. अशी उच्चकोटीची सुरक्षा यंत्रणा भेदून एक हल्लेखोर थेट हॉटेलमध्ये शिरतो आणि राष्ट्राध्यक्षांवर हल्ला करतो हे अजूनही काही लोकांच्या पचनी पडत नाही त्यामुळेच ते या हल्ल्यावर संशय घेत आहेत. अमेरिकेन राष्ट्राध्यक्षांनी सुरक्षा व्यवस्था इतकी तकलादू असू शकते यावर काही लोकांचा विश्वासच नाही त्यामुळे ते या हल्ल्याबाबत संशय व्यक्त करत आहेत अर्थात त्यांनी संशय घेण्यासारखीच परिस्थिती आहे हे देखील मान्य करावेच लागेल.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# अक्षय तृतीयेपासून जिल्ह्यात ११ बालविवाह रोखले

## ■ महिला व बाल विकास विभागाची धडक कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** महिला व बाल विकास विभागाच्या सतर्कतेमुळे अक्षय तृतीयाच्या मुहूर्तापासून नांदेड जिल्ह्यात विविध ठिकाणी होऊ घातलेले एकूण ११ बालविवाह रोखण्यात यश आले आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

चाईल्ड लाईन १०९८ ही राष्ट्रीय आपत्कालीन सेवा २४ तास कार्यरत असून, बालकांच्या काळजी व संरक्षणाशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यात येते. १९ एप्रिलपासून अक्षय तृतीयाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात विविध ठिकाणी बालविवाह होत असल्याच्या तक्रारी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त झाल्या. या तक्रारींची तत्काळ दखल घेत महिला व बाल विकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, पोलीस प्रशासन तसेच स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून थेट घटनास्थळी जाऊन कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान संबंधित वधू-वरांचे वय तपासून बालविवाह थांबविण्यात आले. त्यामुळे संभाव्य अनर्थ टळले. देगलूर तालुक्यातील १, नायगाव तालुक्यातील २, लोहा तालुक्यातील ३, नांदेड तालुक्यातील ३, भोकर तालुक्यातील १ व मुखेड तालुक्यातील १ असे एकूण ११ बालविवाह रोखण्यात यश आले आहे.

बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार विवाहासाठी मुलाचे किमान वय २१ वर्षे व मुलीचे १८ वर्षे असणे आवश्यक आहे. या संदर्भात विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत आहे. ग्रामस्तरावर ग्रामपंचायत अधिकारी व अंगणवाडी सेविका यांची भूमिका बालविवाह प्रतिबंधासाठी महत्त्वाची ठरत आहे.

जिल्ह्यात कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तत्काळ १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

## ट्राफिक ब्लॉकमुळे काही गाड्यांच्या वेळेत बदल व मार्गांतर

**नांदेड (प्रतिनिधी)–** तिरुपती यार्ड येथे किमी १०३/३८४० वरील ब्रिज क्रमांक १५४ चे पाईप टाइपवरून बॉक्स टाइपमध्ये रूपांतर करण्याचे काम करण्यात येत आहे. या कामासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी २७ एप्रिल ते २ मे दरम्यान प्रत्येकी ६ तासांचे एकूण ६ ट्राफिक ब्लॉक मंजूर केले आहेत.

या कामामुळे खालीलप्रमाणे काही गाड्यांच्या धावण्यात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

**गाडीचे पुनर्नियोजन:** गाडी क्र. ०७१८९ हजूर साहिब नांदेड धर्मावरम एक्सप्रेस ही १ मे २०२६ रोजी हजूर साहिब नांदेड येथून ३६० मिनिटे (६ तास) उशिरा सुटेल.

**गाडीचे मार्गांतर :** गाडी क्र. ०७६०५ तिरुपती अकोला एक्सप्रेस ही १ मे २०२६ रोजी तिरुपती रेणिगुंटा गुत्ती मार्गे वळविण्यात येईल. मार्गांतरामुळे ही गाडी पाकाला (PK), पिलेर (PIL), मदनपल्ले रोड (MPL), मुलकल्लाचेरुवू (MCU), कादिरी (KRY), धर्मावरम (DMM²) आणि अनंतपूर (TP) या स्थानकांवर थांबणार नाही.

## ‘यशवंत’ मध्ये पर्यावरण संवर्धन, झिरो प्लास्टिक, ग्रीन कॅम्पस मिशनसाठी कृतिशील उपक्रम




**नांदेड (प्रतिनिधी) –**यशवंत महाविद्यालयात भारत एनवोर्मेन्ट प्रोग्राम : भारत सस्टेनेबल कॅम्पस मिशन-२०२६ अंतर्गत विविध उपक्रम माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार व डॉ. एल. व्ही. पद्माराणी राव यांच्या समन्वयाद्वारे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. रिसर्च हाइट्स फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित या अभियानात १५८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

उपक्रमाचा प्रारंभ प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे व समन्वयिका डॉ. एल. व्ही. पद्मारानी राव यांच्या प्रमुख उपस्थितीत अमूल्य मार्गदर्शनाने झाला. प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी उद्घाटनप्रसंगी, हरित कॅम्पस हे केवळ शिक्षणाचे स्थान नसून ज्ञान आणि निसर्ग यांच्यातील सुसंवादाचे जिवंत उदाहरण असल्याचे प्रतिपादन केले.

तद्नंतर डॉ. कैलास इंगोले यांच्या समन्वयाखाली यशवंत महाविद्यालय ते भाग्यनगर मार्गावर समुदाय जनजागरण रॅली काढण्यात आली. भाग्यनगर परिसरात विद्यार्थ्यांनी पथनाट्याद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश उपस्थितांना दिला.

डॉ. राजरत्न सोनटक्के यांच्या प्रयत्नातून झिरो प्लॅस्टिक ड्राईव्ह अंतर्गत बाबानगर येथील शासकीय रुग्णालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. डॉ. रमेश चिल्लावार यांच्या समन्वयाखाली कॅम्पस ग्रीन ॲक्शन अंतर्गत महाविद्यालयाच्या बोटॅनिकल गार्डनमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्या ठिकाणी डॉ. संतोष राऊत यांनी कचरा व्यवस्थापन व जलपुनर्वापर यावर मार्गदर्शन केले.

डॉ. बी. बालाजीराव यांनी विद्यार्थ्यांना पोस्टर सादरीकरणाकरिता सहकार्य केले. डॉ. एम. एम. व्ही. बेग यांनी महाविद्यालयाचे ग्रीन ऑडीट केले. डॉ. मदन अंबोरे यांनी सस्तेनेबलिटी आयडियाज अँड सोल्युशन या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण कल्पना मांडण्याकरिता सहकार्य केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रियंका सिसोदिया, लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर, प्रा. अभिनंदन इंगोले, डॉ. कांचन गायकवाड यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी डॉ. प्रवीणकुमार मिरकुटे, डॉ. योगेश नकाते, डॉ. सचिन पाटील, डॉ. विश्वाधार देशमुख, डॉ. वीरभद्र स्वामी, डॉ. अजय गव्हाणे आदींची उपस्थिती होती.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक गजानन पाटील, जगन्नाथ महामुने यांनी सहकार्य केले.

## प्रेताची ओळख पटविण्यासाठी सहकार्य करण्याचे पोलिसांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** वजिराबाद पोलीस स्टेशनच्या हद्दीत रेल्वे स्टेशन परिसरात एका अनोळखी पुरुषाचे प्रेत आढळून आले आहे. प्रथमदर्शनी सदरील इसम जुनाट आजाराने मरण पावल्याचे पोलिसांनी अहवालात नमूद केले आहे.

मयत इसमाचे अंदाजे वय ३५ ते ४० वर्षे असून बांधा सडपातळ आहे. हे प्रेत विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शवागारात ठेवण्यात आले आहे. सदरील लांबट चेहऱ्याच्या प्रेताचा रंग सावळा असून लाल रंगाचे टिशर्ट व निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट परिधान केली आहे. सदरील प्रेताची ओळख अद्यापपर्यंत पटली नसून वरील वर्णनाच्या व्यक्तीस कुणी ओळखत असल्यास वजिराबाद पोलीस स्टेशन येथे संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

## नांदेडमध्ये उद्या कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळावा

### मेळाव्यात लाभार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे -मंत्री अतुल सावे

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील शेतकरी, लघुउद्योजक, सुशिक्षित बेरोजगारांना स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी इतर मागास बहूजन कल्याण विभागाच्या वतीने लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्ह्यातील लाभार्थीसाठी कर्जवाटप व स्वयंरोजगार मेळाव्याचे गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात लाभार्थींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.

इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वंसतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती आणि वनार्टी यांच्या संयुक्त विद्यामाने लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यातील लाभार्थ्याकरिता शंकरराव चव्हाण सभागृह, विष्णुनगर, नांदेड या सभागृहात दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता कर्ज वाटप व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती व वनार्टी या महामंडळाच्या कर्ज वाटप व प्रशिक्षण योजनांबाबत ऑनलाईन अर्ज कसा करावा, अर्जाकरिता आवश्यक कागदपत्रे कोणती आणि अर्जातील त्रृटी कशा टाळाव्यात याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महाज्योती व वनार्टी या योजनेतील पात्र, निवड झालेल्या लाभार्थ्यांना सशर्त हेतुपत्र, मंजुरी पत्राचे वाटप, प्रशस्तीपत्र, मेडलचे वाटप, ट्रॅक्टर, वाहने वगैरे वस्तुचे वितरण करण्यात येणार आहे.

## राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणातील बेकायदेशीर भूसंपादन मावेजा वाटपाचा अहवाल त्वरित द्या

### विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**नांदेड (प्रतिनिधी) –**शहराला लागून असलेल्या मुजामपेठ (गट क्र. १७) येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६९ च्या रुंदीकरणातील बेकायदेशीर भूसंपादन मावेजा वाटप रद्द करणे व चौकशी समितीचा अहवाल आपल्या स्तरावरून येत्या दहा दिवसांत सादर करावा, असे पत्र नूतन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांना पाठविले आहे. विशेष म्हणजे या प्रकरणातील उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी लवकरच सेवानिवृत्त होत आहे.

नांदेड तालुक्यातील मुजामपेठ गट क्रं. १७ येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ च्या रुंदीकरणात बेकायदेशीर भूसंपादन मावेजा वाटप व इतर काही मुद्याचे संदर्भात प्राप्त तक्रारीमध्ये चौकशी समितीने केलेल्या चौकशीवर तीव्र आक्षेप घेवून समितीने सादर केलेला चौकशी अहवाल फेटाळणेसंबंधी विनंती केली आहे.

संबंधित तक्रारदार शेख एजाज यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जासमवेत सादर केलेले पुरावे व समितीने सादर केलेला चौकशी अहवाल पडताळणी केला असता अहवाल विसंगत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तक्रारदार यांनी मुख्य आरोपी मारोतराव बाबुराव नळगे यांचे भूसंपादन प्रकरणात पुराव्यासह सादर केले असून प्रस्तावित भूसंपादन करताना भूसंपादन अधिकारी यांनी कोणत्याही मूळ अभिलेख, दुबार भूसंपादन, न्यायालयीन निर्णय तसेच भूसंपादन कायद्यानुसार विवादीत परीस्थितीत रक्कम न्यायालयात जमा न करणे या बाबी पूर्णतः दुर्लक्षित करुन चुकीच्या पध्दतीचा अवलंब करुन मावेजा वितरणाची प्रक्रीया पार पाडल्यामुळे तक्रारीस पुरेसा वाव मिळाला आहे, असे त्यांनी स्पष्ट नमूद केलेले या मुद्याचा खुलासा आपल्या चौकशी अहवालात दिसून येत नाही.

संबंधित तक्रारदार यांची पूर्वीपासूनच तक्रार असल्यामुळे सदर प्रकरणात आपल्या कार्यालयाकडून अहवाल क्र. २०२१/आरबी/डेस्क-३/भूसं सीआर १२/ दिनांक ०९ ऑगस्ट २०२१ प्राप्त झाला असता उक्त अहवाल पडताळणीचे अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र जा. क्र. २०२१/भूसंपादन/कक्ष-२/कावी ३७७, ४२२ दिनांक २५ ऑक्टोंबर, २०२१ अन्वये काढण्यात आलेल्या मुद्याचे सविस्तर खंडण/खुलासा न करता मोघम स्वरुपात दुसरा अहवाल क्रं. २०२५/मशाका-१/आस्था-३/वि. चौ. /प्र.क्र. दिनांक २७/१०/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे. ज्यामध्ये तक्रारदार यांनी पुर्वीच्या तक्रारीत उपस्थित केलेल्या मुद्याचे खंडण होऊ शकत नाही व दुसऱ्या अहवालातही खंडण/खुलासा केलेला नाही.

या प्रकरणात योग्य ती चौकशी तातडीने होऊन निर्णय न झाल्यास भविष्यात न्यायालयीन विवाद उपस्थिती झाल्यास त्यामध्ये शासनाविरुध्द काही आदेश पारीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे शासनाची प्रतिमा मलीन होणार नाही यादृष्टीने आपण व्यक्तीश: लक्ष घालून आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल १० दिवसांच्या आत न चुकता सादर करावा, असे पत्राद्वारे जिल्हाधिकारी नांदेड यांना कळविले आहे.

## प्रवाशांच्या सुविधेसाठी तपोवन एक्सप्रेस व मराठवाडा एक्स्प्रेसला कायमस्वरूपी अतिरिक्त डबे

**नांदेड (प्रतिनिधी) –**प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन तसेच प्रवासाची सुविधा वाढविण्याच्या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड विभागातील दोन महत्त्वाच्या गाड्यांमध्ये कायमस्वरूपी दोन अतिरिक्त सामान्य श्रेणी डबे जोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार खालील गाड्यांमध्ये प्रत्येकी २ सामान्य श्रेणीचे डबे वाढविण्यात येणार असून, गाडीची रचना १८ डब्यांवरून २० डब्यांची करण्यात येणार आहे.

गाडी क्र. १७६१८/१७६१७ हजूर साहिब नांदेड-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-हजूर साहिब नांदेड तपोवन एक्स्प्रेस या गाडीमध्ये दोन अतिरिक्त सामान्य श्रेणीचे डबे जोडण्यात येणार आहेत. हजूर साहिब नांदेड येथून प्रभावी दि. २९ एप्रिल. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून प्रभावी दिनांक ३० एप्रिल. गाडी क्र. १७६८८/१७६८७ धर्माबाद - मनमाड - धर्माबाद-मराठवाडा एक्सप्रेस या गाडीमध्ये दोन अतिरिक्त सामान्य श्रेणीचे डबे जोडण्यात येणार आहेत.

धर्माबाद येथून प्रभावी दि. २८ एप्रिल ममाड येथून प्रभावी, दि. २८ एप्रिल या कायमस्वरूपी वाढीमुळे प्रवाशांसाठी अधिक आसन क्षमता उपलब्ध होणार असून, प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे. प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येते.

## बाऱ्हाळी परिसरात ‘लाडकी बहीण’ योजनेत अनेक लाभार्थी बहिणी वंचित?

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)–** बाऱ्हाळी परिसरात राबविण्यात येत असलेल्या ‘लाडक्या बहीण’ योजनेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी आढळून येत असून, खऱ्या गरजू व पात्र महिलाच या योजनेपासून वंचित राहत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना सहाय्य देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे असा आहे. मात्र, प्रत्यक्षात अर्ज प्रक्रियेतील अडथळे, आवश्यक कागदपत्रांची कमतरता, तसेच माहितीचा अभाव यामुळे अनेक महिलांना लाभ मिळत नाही. काही ठिकाणी अपात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जात असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत.

स्थानिक महिलांनी सांगितले की, त्यांनी वेळेत अर्ज करूनही त्यांना अद्याप कोणताही लाभ मिळालेला नाही. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून पात्र महिलांना त्वरित न्याय द्यावा, तसेच योजनेची अंमलबजावणी पारदर्शक व प्रभावी पद्धतीने करावी, अशी मागणी होत आहे.

या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी लाभार्थी महिलांकडून करण्यात येत आहे. परिसरात राबविण्यात येत असलेल्या ‘लाडकी बहीण’ योजनेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी आढळून येत असून, खऱ्या गरजू व पात्र महिलाच या योजनेपासून वंचित राहत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना सहाय्य देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे असा आहे. मात्र, प्रत्यक्षात अर्ज प्रक्रियेतील अडथळे, आवश्यक कागदपत्रांची कमतरता, तसेच माहितीचा अभाव यामुळे अनेक महिलांना लाभ मिळत नाही. काही ठिकाणी अपात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जात असल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत.

स्थानिक महिलांनी सांगितले की, त्यांनी वेळेत अर्ज करूनही त्यांना अद्याप कोणताही लाभ मिळालेला नाही. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून पात्र महिलांना त्वरित न्याय द्यावा, तसेच योजनेची अंमलबजावणी पारदर्शक व प्रभावी पद्धतीने करावी, अशी मागणी होत आहे.

## मुदखेड तालुक्यातील वाळू घाटावर महसूल प्रशासनाची कारवाई



**मुदखेड (प्रतिनिधी) –**रविवार, दि. २६ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता मुदखेडचे तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली अवैध वाळू उत्खननाविरुद्ध कारवाई करण्यात आली. मौजे खुजडा व मौजे टाकळी येथे महसूल पथकाने छापा टाकून अवैधरित्या वाळू उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान दोन मोठ्या बोटी इंजिनसह जप्त करून जिलेटिनच्या साहाय्याने नष्ट करण्यात आल्या. प्रशासनाची ही धडक कारवाई अशी सुरू राहावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

यापुढेही अशाच प्रकारच्या कारवाया सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याचे तहसीलदार यांनी सांगितले. या कारवाईत तहसीलदार आनंद देऊळगावकर, नायब तहसीलदार संतोष कामठेकर, पुरवठा निरीक्षण अधिकारी समीर पोहणे, अव्वल कारकून (महसूल) श्याम चौधरी, मंडळ अधिकारी रूपाली जडे, ग्राम महसूल अधिकारी प्रसाद पांडे, संताजी देवापूरकर, राजू चव्हाण, राजू मस्के, श्रीमती रंजना दमकोंडवार तसेच कोतुरवार व इतर अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

## बाबू शिंदे यांना मूकनायक नॅशनल अवॉर्ड जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** यावर्षी दिला जाणारा मूकनायक नॅशनल अवॉर्ड-२०२६ येथील बाबू शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे.



या पुरस्काराच्या निवडीचे पत्र दै. वीरशिरोमणीचे मुख्य संपादक शंकरसिंह ठाकूर आणि दै. नंदगिरीचा कानोसाचे संपादक मारोती शिकारे यांच्या हस्ते शिंदे यांना प्रदान करण्यात आले. मूकनायक नॅशनल अवॉर्डचे वितरण १८ मे २०२६ रोजी एका समारंभात मान्यवरांच्या हस्ते बाबू शिंदे यांना प्रदान करण्यात येणार आहे. या निवडीबद्दल बाबू शिंदे यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

## मुदखेड येथे वासवी जन्मोत्सव भक्ती भावाने व उत्साहात साजरा



**मुदखेड (प्रतिनिधी) –**श्री वासवी माता कन्यका परमेश्वरी जयंतीनिमित्त मुदखेड शहरात विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. सकाळी वासवी चौकात वासवी मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन फटाक्याच्या आतीषबाजीत जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

२८ एप्रिल रोजी शोभायात्रा काढण्यात आली. रविवारी झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे माजी राज्य प्रसिद्धीप्रमुख नरेंद्र येरावार, सह गिरीश काचावार, नितीन रायपत्रेवार, शंकर पिंपरवार, प्रवीण काचावार, ज्ञानूअप्पा वट्टमवार, मनीष रायपत्रेवार, अनिल काचावार, दत्तात्रय लापशेटवार, गजानन वट्टमवार, राघवेंद्र पबितवार, विशाल वट्टमवार, अतुल काचावार, सचिन काचावार, वैभव वट्टमवार, गिरीष कोतावार, ईशान चक्करवार, मयुर पिंपरवार, आर्य वैश्य युथचे वैभव पिंपरवार, आयुष रायपत्रेवार, गंगाधर रायपत्रेवार, सोहम काचावार, कृष्णा पिंपरवार, शुभम पिंपरवार, दर्शन मोटरवार, पियुष लाभसेटवार, श्रीनिवास चक्करवार, राज काचावार आदींसह समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

## किरोडा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**लोहा (प्रतिनिधी) –**लोहा तालुक्यातील मौजे किरोडा येथे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सकाळच्या सत्रात प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व नंतर पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक बहूजन जयंती मंडळाचे अध्यक्ष सरपंच कंठीराम पाटील जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी युवा नेते नंदू पाटील लुंगारे, माजी सरपंच देवीदास पाटील जाधव, मारोती पाटील माने, ज्येष्ठ पत्रकार सुरेश जोंधळे, ज्येष्ठ नागरीक बाबाराव जोंधळे आदी उपस्थित होते. मोहन जोंधळे यांनी बुद्धवंदना विधीवत पूजापाठ केली.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. नंतर सायंकाळी ५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची भीमगड येथून मिरवणूक काढण्यात आली.

भीम जयंतीनिमित्त काढण्यात आलेली मिरवणुकीत ग्रामस्थांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. मिरवणुकीच्या समारोपानंतर भोजनदान करण्यात आले. या कार्यक्रमास भीमजयंती मंडळाचे अध्यक्ष कंठीराम जाधव, सुनिल जोंधळे, आनंदा जोंधळे, विलास सावळे, विनोद महाबळे, सुधाकर जोंधळे, मोहन जोंधळे, माधव जाधव, खंडू बारोळे, संतोष जाधव, संदीप पा.जाधव, गोविंदराव जाधव, संदीप कौसल्ये, नागोराव जाधव, चंद्रकांत माने, भीमराव जोंधळे, कमलाकर जोंधळे, राजकुमार जोंधळे यांच्यासह ग्रामस्थ सहभाग होते.

## रमाई वधू-वर केंद्राचे उद्घाटन




**नांदेड (प्रतिनिधी)–** बुद्धभूमी पिवळी गिरणी, नांदेड येथे रमाई वधू-वर सूचक केंद्र कार्यालयाचे उद्घाटन मा. खासदार अतुलरीय महाथेरो श्रीलंका यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. प्रा.डॉ. एम. सत्यपाल महाथेरो, बुद्धभूषण, सुगतशांती थेरो बुद्धगया व आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार सुरेशदादा गायकवाड यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

प्रारंभी तथागत बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस अभिवादन करून पंचशील झाल्यावर रमाई वधू-वर सूचक केंद्राचे उद्घाटन झाले. केंद्राचे प्रमुख डी. पी. गायकवाड यांनी भिख्खू संघाचे व मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत केले.

सुरेशदादा गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करताना जास्तीत जास्त पालकांनी आपल्या पाल्यांची नावे केंद्रात नोंदवावीत. तसेच पैसा व वेळेची बचत करण्यासाठी दि. २७ मे २०२६ रोजी महाविहार बावरीनगर, दाभड येथे होणाऱ्या सामूहिक मंगल परिणय सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुद्धोधन जोंधळे यांनी केले, तर आभार जी.जी. कोलते यांनी मानले.

यावेळी गंगाधर सूर्यवंशी, प्रा. देवीदास मनोहरे, पी.एस. गवळे, जी.बी. सोनकांबळे, पी. एच. गजभारे, सुभाष काटकांबळे, नगरसेविका राजश्री कुलदीप राक्षसमारे, एम.पी. गायकवाड, शिवाजी सोनकांबळे, डी.एन. गोधने, डी. डी. भालेराव, जी. एस. गायकवाड, भाऊराव जोंधळे, विठ्ठलराव कोलते, बबन महागडे, कमलाकर गायकवाड, एल.पी. गायकवाड, इंगोले, जनार्धन जमदाडे, प्रशांत कोलते, शिद्धू शेळके, नागेश गायकवाड, जयवर्धन भोसीकर, सुरेश व्यवहारे, ज्ञानदीप कांबळे, भगवान गायकवाड, प्रशीक गायकवाड आदी उपस्थित होते.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# बॉडी हिट

## टाळायचे कसे, तज्ज्ञांकडून जाणून घ्या...

**सामान्यतः शरीराचे तापमान ३६.५ ते ३७.५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान असते. जेव्हा तापमान या मर्यादेपेक्षा जास्त होते, तेव्हा त्याला बॉडी हिट म्हणतात. सामान्य परिस्थितीत शरीर घाम गाळून आणि रक्ताभिसरण वाढवून आपले तापमान नियंत्रित करते. तथापि, जेव्हा हे शक्य होत नाही, तेव्हा शरीरात उष्णता साठते, ज्यामुळे शरीरातील उष्णतेशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात. बॉडी हिटची कारणे आणि ती कशी टाळावी हे समजून घेऊया...**

## किडनीवर परिणाम, अशक्तपणा, डोकेदुखी...



### बॉडी हिटचा धोका कोणाला असतो?

- लहान मुले (४ वर्षांखालील) आणि वृद्ध (६५ वर्षांवरील) शरीरातील वाढलेल्या उष्णतेचे सहज बळी ठरू शकतात, कारण त्यांचे शरीर तापमान नियंत्रित करण्यास कमी सक्षम असते.
- हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार, मधुमेह किंवा श्वसनविकार असलेल्या लोकांनी देखील अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे. अशा व्यक्तींचे शरीर आधीच कमकुवत असते आणि त्यांना उष्णता सहन करणे कठीण जाते.
- बाहेर काम करणारे मजूर, खेळाडू किंवा जे जास्त वेळ उन्हात घालवतात, त्यांनाही शरीरातील उष्णतेचा धोका असतो.
- घाम येण्यावर किंवा शरीरातील पाण्याच्या संतुलनावर परिणाम करणारी औषधे घेणाऱ्या लोकांनीही सावधगिरी बाळगावी.

### शरीरातील उष्णता वाढल्यास काय करावे?

- जर शरीराचे तापमान वाढले, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. शरीरातील उष्णता वाढल्यास काही उपाय केले जाऊ शकतात, जसे की...
- जेव्हा शरीरातील उष्णता वाढते, तेव्हा पंखा असलेल्या किंवा वातानुकूलित खोलीसारख्या थंड ठिकाणी जा किंवा सावलीत बसा. शरीरातील उष्णता बाहेर जाण्यासाठी घट्ट कपडे सैल करा.
- हळूहळू पाणी प्या. शरीरातील उष्णता वाढल्यास लगेच खूप थंड पाणी पिणे टाळा. ओरल रिहायड्रेशन सोल्युशन (ORS) किंवा नारळाचे पाणी पिऊ शकता. यामुळे शरीरातील पाणी आणि आवश्यक क्षारांची भरपाई होण्यास मदत होते.
- शरीर थंड करण्यासाठी, ओल्या कापडाने पुसून घ्या किंवा कपाळ, मान आणि काखेत थंड पट्टी ठेवा. थंड पाण्याने अंघोळ करणे देखील उपयुक्त ठरू शकते. पंख्यासमोर बसणे किंवा मोकळ्या हवेत श्वास घेणे देखील फायदेशीर आहे.
- जेव्हा शरीराचे तापमान वाढते, तेव्हा विश्रांती घेणे आवश्यक आहे. किमान १-२ दिवस जड काम किंवा व्यायाम टाळा. कॅफीन (जसे की चहा आणि कॉफी) आणि मद्यपान टाळा, कारण यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता वाढते.



- जर शरीरातील उष्णता वाढल्याची लक्षणे, जसे की चक्कर येणे, बेशुद्ध होणे, उलट्या होणे, हृदयाचे ठोके वाढणे किंवा घाम येणे थांबणे, गंभीर झाल्यास, ताबडतोब स्वतःची तपासणी करून घ्या. ही स्थिती धोकादायक असू शकते.

### वाढलेल्या बॉडी हिटमुळे होणारे आजार

- घामोळ्या (उष्णतेमुळे येणारे पुरळ) : या स्थितीत, घामाच्या नलिका बंद होतात, ज्यामुळे त्वचेवर लहान, लाल पुरळ येतात आणि खाज सुटते.
- उष्णतेमुळे येणारे पेटके : शरीरातील उष्णता वाढल्यामुळे, शरीरातील मीठ आणि पाण्याच्या कमतरतेमुळे स्नायू दुखतात आणि पेटके येतात.
- उष्णतेमुळे येणारा थकवा : याच्या लक्षणांमध्ये जास्त घाम येणे, अशक्तपणा, चक्कर येणे, डोकेदुखी आणि उलट्या यांचा समावेश होतो.
- उष्माघात : ही सर्वात धोकादायक स्थिती आहे. या स्थितीत, शरीराचे तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढते. व्यक्तीला गोंधळ, झटके किंवा बेशुद्धीचा अनुभव येऊ शकतो. अशा परिस्थितीत, त्वरित रुग्णालयात दाखल करणे आवश्यक आहे.
- हृदय आणि मूत्रपिंडांवर होणारा परिणाम : उष्णतेच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने हृदय आणि मूत्रपिंडांवरही परिणाम होऊ शकतो. आधीपासूनच आजार असलेल्या लोकांची प्रकृती बिघडू शकते.



### शरीरातील उष्णता का वाढते?

- शरीराचे तापमान वाढण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे उष्ण हवामानात जास्त वेळ राहणे. उन्हाळ्यात विशेषतः उष्णतेच्या लाटांदरम्यान, शरीर बाहेरील उष्णतेला अधिक संवेदनशील असते. जर हवेत आर्द्रता जास्त असेल, तर घाम व्यवस्थित सुकत नाही, ज्यामुळे शरीर थंड होण्यास अडथळा येतो.
- शरीरातील उष्णता वाढण्याचे आणखी एक कारण म्हणजे अतिरिक्त शारीरिक श्रम. जेव्हा आपण उन्हात काम करतो किंवा जास्त व्यायाम करतो, तेव्हा शरीरातील उष्णता वाढते. जर आपण या काळात कमी पाणी प्यायलो, तर ही समस्या आणखी गंभीर होते.
- निर्जलीकरण म्हणजेच शरीरातील पाण्याची कमतरता, हे देखील एक प्रमुख कारण आहे. जेव्हा शरीरात पाण्याची कमतरता असते, तेव्हा घाम कमी येतो आणि शरीर थंड होऊ शकत नाही.
- काही विशिष्ट औषधे जसे की मूत्रवर्धक (diuretics), अँटीहिस्टामाइन आणि काही मानसिक आजारांवरील औषधे, शरीराच्या तापमानावर परिणाम करू शकतात.
- अति मद्यपानामुळे निर्जलीकरण होऊ शकते, म्हणून हे व्यसन टाळणे महत्त्वाचे आहे.
- घट्ट कपडे, कमी हवा खेळती असलेल्या ठिकाणी राहणे आणि थायरॉईड, संसर्ग किंवा लठ्ठपणा यांसारख्या काही वैद्यकीय परिस्थितींमुळे देखील शरीरातील उष्णता वाढू शकते.

### शरीरातील उष्णता कमी करण्याचे उपाय

- सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरेसे पाणी पिणे. दिवसातून किमान २ ते ३ लिटर पाणी प्या आणि उन्हाळ्यात त्याहून अधिक प्या.
- नारळाचे पाणी, ताक आणि ओआरएस (ORS) यांसारखी पेये शरीरासाठी खूप फायदेशीर आहेत. ती शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन राखतात.
- जेव्हा शरीरातील उष्णता वाढते, तेव्हा हलके आणि सैल सुती कपडे घाला. यामुळे हवा खेळती राहते आणि शरीर थंड राहते. दुपारी १२ ते ४ या वेळेत बाहेर जाणे टाळा. कारण या वेळेत सूर्य सर्वात प्रखर असतो. जर बाहेर जाणे आवश्यकच असेल, तर छत्री, टोपी आणि सनग्लासेस वापरा.
- काकडी, टरबूज, दही, ताक आणि फळे यांसारखे थंड पदार्थ खा. तळलेले आणि मसालेदार पदार्थ टाळा. कारण यामुळे शरीरातील उष्णता वाढू शकते.
- घर थंड ठेवण्यासाठी पंखा, कूलर किंवा एसी वापरा. दररोज थंड पाण्याने अंघोळ केल्याने शरीर थंड होण्यास मदत होते.
- जेव्हा शरीरातील उष्णता वाढते किंवा उष्ण हवामानात, सकाळी किंवा संध्याकाळी, जेव्हा हवामान थोडे थंड असते, तेव्हा व्यायाम करा.
- आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. शरीरातील उष्णता ही एक सामान्य पण गंभीर समस्या असू शकते, विशेषतः उन्हाळ्यात. योग्य माहिती आणि थोड्या सावधगिरीने, ती सहज टाळता येते. शरीरातील उष्णतेची लक्षणे लवकर ओळखणे, पुरेसे पाणी पिणे, थंड राहणे आणि सकस आहार घेणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर स्थिती गंभीर वाटत असेल, तर विलंब न करता स्वतःची तपासणी करून घ्या.



# तीन दैनंदिन सवयींमुळे वाढतो मूळव्याधीचा धोका!

## मूळव्याधीमुळे कर्करोग होऊ शकतो का? प्रतिबंधात्मक उपाय जाणून घ्या...

**मूळव्याध ही एक अशी स्थिती आहे ज्यामध्ये गुदद्वार आणि गुदाशयाच्या खालच्या भागातील शिरा सुजतात. शौचास जाताना या शिरांवर दाब पडल्यास त्या सुजतात, ज्यामुळे तीव्र वेदना, जळजळ आणि रक्तस्त्राव होऊ शकतो. मूळव्याध सामान्यतः तीन सवयींमुळे होतो. चुकीच्या खाण्याच्या सवयींमुळे बद्धकोष्ठतेचा त्रास होणाऱ्या लोकांना मूळव्याध होण्याची शक्यता जास्त असते. याव्यतिरिक्त, जे लोक जास्त वेळ बसून काम करतात, डेस्क जॉब करतात किंवा ज्यांची जीवनशैली खराब आहे, त्यांनाही मूळव्याध होऊ शकतो.**

### आयुर्वेदिक उपचार

- गुग्गुळ : मूळव्याधीवरील एक प्रभावी उपाय; यामुळे सूज कमी होते आणि वेदनांपासून आराम मिळतो.
- तूप : याच्या वापरामुळे पचनसंस्थेला वंगण मिळते आणि बद्धकोष्ठता कमी होते.
- क्षार कर्म : एक शस्त्रक्रियाविरहित उपचार. औषध लावल्याने मूळव्याधीच्या गाठी सुकतात. या प्रक्रियेमुळे त्या हळूहळू नाहीशा होतात.

### मूळव्याधीकडे दुर्लक्ष करू नका

मूळव्याध ही एक सामान्य पण त्रासदायक समस्या आहे. ती गंभीर नसते, परंतु त्यावर त्वरित उपचार न केल्यास समस्या वाढू शकते. योग्य आहार घेणे, नियमित व्यायाम करणे आणि शौचाच्या चांगल्या सवयी ठेवणे हे मूळव्याध टाळण्याचे सोपे मार्ग आहेत आणि ते नियंत्रणात ठेवण्यास मदत करू शकतात. शौचाच्या वेळी वारंवार रक्तस्त्राव होणे, तीव्र वेदना, गर्भाशय खाली येणे किंवा दीर्घकाळ बद्धकोष्ठता या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. अशा परिस्थितीत, तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे.

### मूळव्याधीवरील आयुर्वेदिक उपचार

- आयुर्वेदात मूळव्याधीला अर्श म्हटले जाते. अपचन आणि शरीरातील दोष (वात आणि पित्त) वाढल्यामुळे हे होते. पचनक्रिया सुधारणे, बद्धकोष्ठता दूर करणे आणि सूज कमी करणे हे आयुर्वेदाचे मुख्य ध्येय आहे. काही घरगुती उपाय करता येतात...
- जिरे आणि सैंधव मीठ घालून रोज ताक प्या. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि पोटाला थंडावा मिळतो.
- रताळे पचनासाठी चांगले असते आणि मूळव्याध कमी करण्यास मदत करते.
- भोपळा, कडधान्ये आणि डाळी यांसारखे तंतुमय पदार्थ शौचास नरम करतात.
- कोमट पाणी प्या. दिवसभर कोमट पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते.
- सिट्झ बाथसाठी (कोमट पाण्यात बसणे), एका टबमध्ये कोमट पाणी भरा आणि त्यात १०-१५ मिनिटे बसा.

### मूळव्याधीची लक्षणे कशी ओळखावी?

- मूळव्याधीचे दोन मुख्य प्रकार आहेत : बाह्य मूळव्याध, जो गुदद्वाराच्या बाहेर होतो, आणि आंतरिक मूळव्याध, जो गुदद्वाराच्या आत होतो. मूळव्याधीची सुरुवातीची लक्षणे ओळखण्यासाठी, काही गोष्टींकडे लक्ष द्या...
- बाह्य मूळव्याधीची लक्षणे : गुदद्वाराभोवती खाज सुटणे किंवा जळजळ होणे, गुदद्वाराजवळ सूज किंवा गाठी येणे, त्या भागात वेदना किंवा संवेदनशीलता जाणवणे आणि बसताना किंवा शौचास जाताना वेदना वाढणे. कधीकधी ही गाठ कडक होते, ज्यामुळे वेदना वाढतात.
- अंतर्गत मूळव्याधीची लक्षणे : शौचाच्या वेळी किंवा नंतर रक्तस्त्राव होणे, टॉयलेट पेपरवर किंवा अंतर्वस्त्रावर चिकट पदार्थ (म्युकस) दिसणे, वारंवार शौचास जाण्याची तीव्र इच्छा होणे, शौच पूर्ण न झाल्याची भावना होणे किंवा गंभीर प्रकरणांमध्ये मूळव्याध बाहेर येणे (प्रोलॅप्स), ही अंतर्गत मूळव्याधीची लक्षणे आहेत.

### मूळव्याधीचा धोका कोणाला जास्त असतो?

- वृद्धावस्थेत : वाढत्या वयानुसार गुदद्वारातील शिरा कमकुवत होतात. ही समस्या ४५ ते ६५ वयोगटातील लोकांमध्ये अधिक सामान्य आहे.
- गर्भधारणा आणि प्रसूतीदरम्यान : गर्भधारणेदरम्यान पोटावर दाब वाढतो. त्याचप्रमाणे, प्रसूतीदरम्यान जोर लावल्याने शिरांवर परिणाम होतो, ज्यामुळे महिलांमध्ये मूळव्याधीचा धोका वाढतो.
- वाईट सवयी : शौचालयात मोबाईल फोन वापरताना बराच वेळ बसणे, शौचास जाताना जोर लावणे, या सवयींमुळे रक्तवाहिन्यांवर दाब वाढतो, ज्यामुळे मूळव्याध होऊ शकतो.
- बद्धकोष्ठता आणि पचनाच्या समस्या : दीर्घकाळची बद्धकोष्ठता आणि वारंवार होणारा अतिसार या दोन्हीमुळे गुदद्वारावर दाब येतो आणि मूळव्याधीचा धोका वाढतो.
- कमी फायबरयुक्त आहार : जर तुम्ही फळे आणि भाज्या कमी आणि जंक फूड जास्त खात असाल, तर शौच कडक होऊ शकते, ज्यामुळे मूळव्याधीचा धोका वाढतो.
- लठ्ठपणा : अतिरिक्त वजन वाढल्याने पोटातील दाब वाढतो. ज्यामुळे रक्तवाहिन्यांवर परिणाम होतो.
- शारीरिक हालचालींचा अभाव : जे लोक दिवसभर बसून राहतात आणि व्यायाम करत नाहीत, त्यांची पचनक्रिया मंदावते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास वाढतो.
- जड वस्तू उचलणे : वारंवार जड वस्तू उचलल्याने पोटावरील दाब वाढतो, ज्यामुळे मूळव्याध होऊ शकतो.
- आनुवंशिक घटक : जर तुमच्या कुटुंबातील कोणाला मूळव्याध असेल, तर तुम्हालाही तो होण्याची शक्यता जास्त असते.

### मूळव्याध टाळण्याचे उपाय


- तंतुमय पदार्थांनी युक्त आहार घ्या : तुमच्या आहारात फायबरचे प्रमाण वाढवा. फळे, हिरव्या भाज्या, कडधान्ये, ओट्स आणि संपूर्ण धान्य खा. फायबरमुळे शौच मऊ होते आणि ते सहजपणे बाहेर पडण्यास मदत होते.
- भरपूर पाणी प्या : दिवसभरात ८-१० ग्लास पाणी प्या. यामुळे बद्धकोष्ठता टळते आणि पचनक्रिया व्यवस्थित होते.
- शौचाच्या सवयी सुधारा : शौचास कधीही रोखून धरू नका, शौचास जाताना जोर लावणे टाळा, शौचालयात जास्त वेळ बसणे टाळा, शौचालयात असताना मोबाईल फोन वापरणे टाळा आणि गरज असल्यास फूटस्टूलचा वापर करा.
- व्यायाम करा : दररोज २०-३० मिनिटे चाला, योगा करा आणि हलका व्यायाम करा. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठता टळते.
- वजन नियंत्रणात ठेवा : वजन कमी केल्याने मूळव्याधीचा धोका कमी होतो.
- जास्त वेळ बसणे टाळा : जर तुमचे काम बसून करण्याचे असेल, तर दर तासाला उठा, फिरा किंवा अंग ताणा.
- जड वजन योग्य पद्धतीने उचला : श्वास रोखून धरू नका; हळू हळू आणि योग्य तंत्राने वजन उचला.



### मूळव्याधीमुळे कर्करोग होऊ शकतो का?

नाही, मूळव्याधीमुळे कर्करोग होत नाही. तथापि, मूळव्याध आणि कर्करोग यांची लक्षणे सारखी असू शकतात. दोन्ही आजारांमध्ये शौचाच्या वेळी रक्तस्त्राव होऊ शकतो. जर तुम्हाला शौचाच्या वेळी वारंवार रक्तस्त्राव होत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.







# राज्याचा स्वतंत्र बियाणे कायद्याचा केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करणार - कृषी मंत्री

**मुंबई (प्रतिनिधी)** - शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावेत, त्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे तसेच बियाणे खराब निघाल्यास त्याची नुकसानभरपाई तत्काळ मिळावी, यासाठी राज्याचा सर्व शिफारशींसह स्वतंत्र बियाणे कायदा करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्याचे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.


महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०२५ दुसऱ्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत देण्यात आलेले आश्वासन क्र. ६७६ नुसार बियाणे कायदा १९६६ मधील प्रस्तावित बदल व सुधारणा विधेयकासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषी मंत्री भरणे बोलत होते.यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने कायद्यात सकारात्मक निर्णय घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल उपस्थित होते. तसेच आमदार सईताई डहाके, राजेश बकाने, हेमंत ओगले, रणधीर सावरकर, कृषी आयुक्त सुरज मांढरे आणि कृषी संचालक सुनिल बोरकर उपस्थित होते.

कृषी मंत्री भरणे म्हणाले, राज्यासाठी स्वतंत्र बियाणे कायदा करताना प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांना नुकसानभरपाई तातडीने मिळावी यासाठी ठोस तरतुदी कराव्यात. दर्जेदार बियाण्यांची जबाबदारी संबंधित कंपन्यांवर निश्चित करणे, महाबीज कंपनीची कार्यक्षमता वाढविणे, तसेच नियमभंग करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय जिल्हास्तरावर बियाणे तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याची तरतूद करावी. 'साथी' पोर्टलवर ट्रुथफुल बियाण्यांची नोंदणी प्रक्रिया सुरू करणे, तसेच विद्यापीठांमार्फत होणाऱ्या संशोधन प्रक्रियेबाबत कायद्यात स्पष्ट तरतुदी करण्याचाही प्रस्तावात समावेश करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

नव्या कायद्यात बियाणे उत्पादक, प्रक्रिया केंद्र, वितरक, विक्रेते आणि रोपवाटिका यांची नोंदणी सक्तीची करण्याचा विचार आहे. शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे साठवणे, वापरणे, देवाणघेवाण करणे आणि (ब्रँडेड नाव न वापरता) विक्री करण्यास कायदेशीर संरक्षण देण्याची तरतूद करण्यात येणार आहे. रोपवाटिकांची नोंदणी अनिवार्य करून त्यांना रोपांच्या उगमाचा नोंदवही ठेवणे बंधनकारक केले जाईल. तसेच बियाण्यांच्या पिशवीवर क्यूआर कोड देणे आणि 'सेंट्रलाइज्ड सीड ट्रेसिबिलिटी पोर्टल'द्वारे बियाण्यांचा मागोवा घेणे अनिवार्य करणे, बियाण्यांमधील विषाणू, बॅक्टेरिया आणि बुरशी यांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी 'सीड हेल्थ स्टँडर्ड्स' लागू करण्याची तरतूदही करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे पुरवठ्यासाठी शासनाने तांत्रिकदृष्ट्या सक्षम उपाययोजना केल्या असून 'साथी' पोर्टलवर सर्व उत्पादक संस्थांची नोंदणी १०० टक्के पूर्ण झाली आहे. खरीप २०२६ हंगामापासून सर्व प्रकारच्या बियाण्यांचे उत्पादन, वितरण आणि विक्री या पोर्टलमार्फत करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

## सांदणवाट या ग्रंथावर लातूरमध्ये परिसंवाद




**लातूर (प्रतिनिधी)** - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर लिखित त्यांच्या शैक्षणिक, संशोधन, सामाजिक जीवनावर आधारित अनुभव ग्रंथ सांदणवाट हा नुकताच प्रकाशित झाला. अल्पावधीतच या ग्रंथाची लोकप्रियता प्रचंड वाढली आहे. सदरील ग्रंथ विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि समाजामध्ये काम करणाऱ्या विविध क्षेत्रातील लोकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्या अनुषंगाने समाजप्रबोधन अकादमी, लातूर हिंदी साहित्य परिषद, लातूर, सम्यक विचार मंच आणि जयक्रांती कला महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजता जयक्रांती महाविद्यालयाच्या सभागृहात या ग्रंथावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# पाकिस्तानचा अफगाणिस्तान विद्यापीठावर हल्ला, ७ जणांचा मृत्यू

**काबुल (वृत्तसंस्था)** - अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्ष पुन्हा तीव्र झाला आहे. तालिबान सरकारने दावा केला की पाकिस्तानने सोमवारी अफगाणिस्तानवर मोर्टार आणि रॉकेट हल्ले केले. हल्ल्यांमध्ये किमान ७ लोकांचा मृत्यू झाला, तर ७५ हून अधिक लोक जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. जखमींमध्ये विद्यापीठाचे विद्यार्थी, मुले आणि सामान्य नागरिक यांचा समावेश आहे. स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले की, राजधानी असदाबादमध्ये घरांसोबतच सैयद जमालुद्दीन अफगाणी विद्यापीठालाही लक्ष्य करण्यात आले.

तालिबान सरकारचे उपप्रवक्ते हमदुल्लाह फितरत यांनी आरोप केला आहे की, हे हल्ले पाकिस्तानकडून करण्यात आले आहेत.त्यांचे म्हणणे आहे की, सोमवारी दुपारी २ वाजता सुरू झालेल्या या हल्ल्यांमध्ये मोर्टार आणि रॉकेट डागण्यात आले. दुसरीकडे, पाकिस्तानने हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले आहेत. पाकिस्तानच्या माहिती मंत्रालयाचे म्हणणे आहे की, विद्यापीठ आणि निवासी भागांना लक्ष्य केल्याच्या बातम्या पूर्णपणे चुकीच्या आहेत. यापूर्वी रविवारी अफगाणिस्तानच्या कंदाहार प्रांतात पाकिस्तानसोबतच्या सीमेवर पुन्हा हिंसक चकमकीची घटना घडली होती. सूत्रांच्या हवाल्याने दावा केला की, स्पिन बोल्डक परिसरात रात्रीच्या वेळी दोन्ही बाजूंनी गोळीबार झाला. यात पाकिस्तानचे सहा सैनिक मारले गेले. एका सैनिकाला ओलीस ठेवून नेण्यात आल्याचेही



सांगण्यात आले. मध्यरात्री चालवलेल्या या ऑपरेशनमध्ये तालिबानी सैनिक पाकिस्तानी सैनिकांची शस्त्रेही घेऊन गेले होते. मात्र, या दाव्यांची अद्याप स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. असे सांगितले जात आहे की, ही चकमक तेव्हा सुरू झाली जेव्हा रात्री उशिरा पाकिस्तानकडून सीमापार गोळीबार झाला, ज्यात एका स्थानिक मुलाचा मृत्यू झाला. यानंतर तालिबानने प्रत्युत्तर दिले.

ही घटना अशा वेळी घडली आहे, जेव्हा दोन्ही देशांमध्ये आधीच तणाव आहे. पाकिस्तानने मार्चमध्ये राजधानी काबुलमधील एका व्यसनमुक्ती केंद्रावरही हल्ला केला होता, ज्यात ४०० हून अधिक लोकांच्या मृत्यूचा दावा करण्यात आला होता. दोन्ही देशांनी मार्चमध्ये युद्धबंदी (सीजफायर) केली होती, ज्यामुळे अनेक आठवड्यांपासून सुरू असलेल्या रक्तरंजित चकमकी थांबल्या होत्या, पण आता परिस्थिती पुन्हा बिघडताना दिसत आहे. चीन व्यतिरिक्त तुर्कस्तान, कतार, संयुक्त अरब अमिराती आणि सौदी अरेबियानेही हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला आहे.

# मे महिन्यात १३ दिवस बँका बंद

**मुंबई (प्रतिनिधी)** - मे २०२६ महिन्यात देशभरातील बँक ग्राहकांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली असून, विविध सण, राष्ट्रीय आणि प्रादेशिक सुट्ट्यांमुळे एकूण १३ दिवस बँका बंद राहणार आहेत. भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) ने जाहीर केलेल्या अधिकृत सुट्टीच्या कॅलेंडरनुसार २७ एप्रिल ते ३ मे या आठवड्यातच काही महत्त्वाच्या सुट्ट्या येत असल्याने ग्राहकांनी बँकेच्या कामांचे नियोजन आधीच करणे गरजेचे ठरणार आहे.

या आठवड्यात १ मे रोजी महाराष्ट्र दिन, कामगार दिन, बुद्ध पौर्णिमा आणि पंडित रघुनाथ मुर्मू जयंती या निमित्ताने देशातील बहुतांश राज्यांमध्ये बँका बंद राहतील. त्यानंतर ३ मे रोजी रविवार असल्यामुळे पुन्हा एकदा बँकांना सुट्टी असेल. मात्र २ मे हा पहिला शनिवार असल्याने त्या दिवशी बँका सुरू राहणार आहेत. बँका दर महिन्याच्या पहिल्या, तिसऱ्या आणि पाचव्या शनिवारी सुरू असतात, तर दुसरा आणि चौथा शनिवार सुट्टीचा असतो, ही बाब ग्राहकांनी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

बँकांच्या या सुट्ट्या 'नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स क्ट' अंतर्गत जाहीर केल्या जातात. या कायद्याअंतर्गत चेक क्लिअरन्स, प्रॉमिसरी नोट्स यांसारख्या व्यवहारांवर या दिवशी प्रक्रिया केली जात नाही. मात्र, विविध राज्यांमध्ये स्थानिक सणांनुसार सुट्ट्यांमध्ये थोडाफार फरक असू शकतो, त्यामुळे ग्राहकांनी आपल्या स्थानिक शाखेशी संपर्क साधून खात्री करणे अधिक योग्य ठरेल. दरम्यान, शाखा बंद असल्या तरी डिजिटल बँकिंग सेवा सुरळीत सुरू राहणार आहेत. मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, यूपीआय व्यवहार आणि एटीएमद्वारे पैसे काढणे या सर्व सुविधा कोणत्याही अडथळ्याशिवाय उपलब्ध असतील.

# नाशिकमध्ये जिल्हा परिषदेचे तीन अधिकारी लाच स्विकारतांना जाळ्यात

**नाशिक (प्रतिनिधी)** - नाशिकमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने मोठी कारवाई करत जिल्हा परिषदेच्या तीन अधिकाऱ्यांना लाच स्वीकारतांना रंगेहाथ ताब्यात घेतले आहे. या प्रकरणाने जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील भ्रष्टाचाराचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. मोजमाप पुस्तिकेवर स्वाक्षरी करण्यासाठी कंत्राटदाराकडून ६ हजार रुपयांची लाच घेताना वर्ग १, २ आणि ३ अशा तिन्ही श्रेणीतील अधिकाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या प्रकरणात सतीश साहेबराव दराडे (४२, रा. मखमलाबाद), सागर सतीश रावले (३५, रा. मखमलाबाद) व रवींद्र रामनाथ गायकवाड (२९, रा. चांदशी) या तिघांना ताब्यात घेतले आहे. हे तिघेही जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या इगतपुरी उपविभागात कार्यरत असून, इगतपुरी तालुक्यातील पिंपळगाव मोर येथे ही कारवाई करण्यात आली.मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून ठेकेदारीचा परवाना घेतला आहे. त्यांनी पिंपळगाव मोर ग्रामपंचायतीची दोन कामे नोव्हेंबर २०२५ मध्ये मुदतीत पूर्ण केली होती.

या कामाचे अंदाजे ४ लाख ५० हजार रुपयांचे बिल काढण्यासाठी 'मोजमाप पुस्तिके'वर स्वाक्षरी होणे आवश्यक होते. यासंदर्भात त्यांनी संशयित स्थापत्य अभियांत्रिकी सहायक असलेले रावले यांची भेट घेत चर्चा केली. मात्र, बिलाच्या २ टक्के म्हणजेच १ हजार रुपये घेतल्याशिवाय संशयित



सहायक अभियंता दराडे स्वाक्षरी करणार नाहीत, असे सांगितले अन त्यास दराडे यांनीही दुजोरा दिला. दरम्यान, तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. यानंतर तक्रारीची शहानिशा करुन सोमवार (दि.२७) रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. तडजोडीनंतर ६ हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानंतर इगतपुरी उपविभागाच्या कार्यालयात संशयितांनी हे पैसे टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवण्यास सांगितले. यावेळी दराडे यांनी पैसे स्वीकारून ते कनिष्ठ सहायक असलेल्या संशयित गायकवाडकडे सोपवताच दबा धरून बसलेल्या एसीबीच्या पथकाने तिघांनाही अटक केली.

विशेष म्हणजे लाचलुचपतच्या या कारवाईत एकाच वेळी तीन वेगवेगळ्या स्तरावरील अधिकारी सहभागी असल्याचे समोर आले आहे. यात लाचेची मागणी रावले याने केली, त्याला दराडे यांनी संमती दिली आणि पैसे गायकवाड याने सांभाळले. या तिघांविरुद्ध इगतपुरी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला असून, याचा तपास एसीबी करत आहे.

## महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

वखार केंद्रः- लोहा

Email:- loha.wh@mswc.in, shivaji.wanjare@mswc.in मो. क्र. 9850611382

दि.२८.०४.२०२६

### जाहीर नोटीस

**मे.नाफेड लि.मुंबई,ता.मुंबई जि.मुंबई**( NAFED LTD. (PSS-K-2025), Mumbai, Mumbai) यांनी महाराष्ट्र स्टेट वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन पुणे यांनी चालवलेल्या लोहा येथील वेअरहाऊस मध्ये २५० (दोनशे पन्नास) पोती,सोयाबिन मालाचे अंदाजे वजन १२५ क्विंटल सण २०२५ शेरा रक्कम रुपये ७३२६००.००/-आमच्या वेअरहाऊस मध्ये ठेवली आहेत.या माला बद्दल वेअरहाऊसमन **श्री.एस.एम.वंजारे** यांनी वेअरहाऊस पावती नंबर १६०८१०२४३० तारीख ३१.१२.२०२५ ची दिलेली आहे.वर निर्दिष्ट केलेल्या माल ठेवणाऱ्याने वर दर्शवलेल्या मालाबद्दलची वेअरहाऊस रिसीट नं.१६०८१०२४३० ता.३१.१२.२०२५ गहाळ झाल्याबद्दल व ती सापडत नसल्याबदल आम्हास कळविले आहे.या नोटीसीद्वारे जाहीर करण्यात येत आहे की, वर नमूद केलेली व दाखवलेल्या मालाची वेअरहाऊस रिसीट कोणास सापडली असल्यास अगर मूळ मालकाने कोणाकडे डिपॉझिट केली असल्यास अगर विकली असल्यास ती धारण करणाऱ्याने आमच्याकडे ता.०६.०५.२०२६ चे आत आमच्या ऑफिसमध्ये वेअरहाऊसमन **श्री.एस.एम.वंजारे** यांच्यासमोर ऑफिसच्या वेळेमध्ये हजर करावी.व स्वतःचा कोणत्याही प्रकारचा बोजा अगर मालकी वगैरे असल्यास ते प्रस्थापित करावे. वरील वेअरहाऊस रिसीट हजर न केल्यास नुसत्या तक्रारीचा अगर हक्काचा विचार केला जाणार नाही.वरील तारखेपर्यंत कोणाकडूनही वरील वेअर हाऊस रिसीट व तक्रार अगर हक्काबद्दल काहीही प्रस्थापित न केल्यास वर नमूद केलेल्या माल ठेवीदाराला डुप्लिकेट रिसीट देण्यात येईल,व त्यानंतर कोणतीही मूळ वेअरहाऊस रिसीट नं.१६०८१०२४३० तारीख ३१.१२.२०२५ ची आणल्यास ती रद्द पावती समजली जाऊन, त्याबद्दल कोणत्याही मागणीचा विचार केला जाणार नाही.

**ठिकाण** :- लोहा
**तारीख** :- २८.०४.२०२६
**पूर्ण पत्ता** :- महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,
मार्केट यार्ड, सर्वे नं.१०७, श्री शिवाजी महाराज चौक लोहा,
ता.लोहा जि. नांदेड - ४३१७०८

**स्वाक्षरीत**
**साठा अधिक्षक**
**म.राज्य वखार महामंडळ,ता.लोहा.**
**जि.नांदेड.**

## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उद्योगनगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेडमधील प्लॉट क्र. ७० बी. हा श्री कृष्णा यादवराव व्यवहारे यांचा असून, प्लॉटची चतुःसिमा : पूर्वेस- प्लॉट नं. ७० ए, पश्चिमेस-प्लॉट क्र. ७१, उत्तरेस- रोड, दक्षिणेस- प्लॉट क्र. ४९ अशी असून, या प्लॉटमधील अर्धा भाग ७० बी. सौ. सुकेशनी दिगंबरराव चिकाटे यांनी विकत घेण्याचे ठरविले असून, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या प्लॉट प्रकरणी कोणाची हरकत असल्यास संबंधितांनी लेखी आक्षेप उद्योग नगर सहकारी भाडेकरू मालकी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेडचे अध्यक्ष/सचिव यांचेकडे पुराव्यासह १५ दिवसांचे आत तक्रार नोंदवावी. या कालावधित आक्षेप आला नाही तर कोणाचाही आक्षेप अथवा हरकत नाही असे गृहीत धरून सदरील प्लॉट ७० बी. सौ. सुकेशनी दिगंबरराव चिकाटे यांच्या नावे हस्तांतर करण्यात येईल, असे जाहीर करण्यात येत आहे. करिता जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
**अध्यक्ष/सचिव**
**उद्योगनगर सहकारी भाडेकरू**
**मालकी गृहनिर्माण संस्था मर्या. नांदेड**
**तथा लक्ष्मी के. सदन**
**कोसबतवार कॉम्प्लेक्स शिवाजीनगर, नांदेड**
**मो. ९९२२३३५२८५**

## कागदपत्र हरवले

यशवंत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था लोहा ता. लोहा जि. नांदेड या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र हरवले आहेत भगवान बापूराव हाके रा.मंगरुळ ता. लोहा जि. नांदेड येथील रहिवाशी असुन मी माझ्या कडील यशवंत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था लोहा ता.लोहा जि. नांदेड या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र ज्याचा के. १८६० व १९५० चे एफ ८५४६ व महा हे प्रमाणपत्र माझ्याकडुन दि. ११/०४/२०२६ रोजी पोलिसवाडी ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याकडे जात असताना माझ्याकडील असलेले संस्थेचे मुळ दस्त ऐवज गहाळ झाले आहेत गहाळ झालेल्या दस्तऐवज कुणाला मिळाले असतील तर खालील पत्त्यावर संपर्क साधावा

**संपर्क :- भगवान बापूराव हाके**
**रा. मंगरूळ ता. लोहा जि. नांदेड**
**मो.नं.९७६६२२६७७७**

## Change In Name

My old name is **MOHAMMED MUJEEB SYED BABU** which is now i am changing New name **SAYYED MUJEEB SAYYED YUNUS** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.

Address :-BAZAR GALLI POLICE STATION JAWAL MUDKHED , NANDED, MAHARASHTRA 431806 Mobile No 8856933270


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. भरत धोंडीबा पवार ,रा. नांदेड ता. जि.नांदेड** यांनी **मौ. असदुल्लाबाद ता. जि.नांदेड सर्वे नं. २३ भूमापन क्र. १०५७६ मधील प्लॉट क्र. ०३ क्षेत्र १५०० चौ.मी.** जमिन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा **मौ. असदुल्लाबाद ता. जि.नांदेड सर्वे नं. २३ भूमापन क्र. १०५७६ मधील प्लॉट क्र. ०३ क्षेत्र १५०० चौ.मी.** ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही,असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपजिल्हाधिकारी (सामान्य)
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड


## Change In Name

My old name is **SYED MOHSIN** which is now i am changing New name **SYED MOHSIN SYED MOIN** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.

Address :- 2-4-80 SUBHASH GANJ MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806. Mobile No 9021824913

ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨਾਂਦੇੜ- ੪੩੧ ੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰਾ)-ਭਾਰਤ



Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India

Ph.No. 02462-234813, 241266, 243559

E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com

No. 284/26-27 Date 28/4/26

### TENDER NOTICE

### GURUDWARA SACHKHAND BOARD, NANDED

### (Engineering Section)

Sealed tenders are invited from eligible and authorized dealers/distributors for **Annual Rate Contract (ARC)** for supply of Paint Materials for various buildings under Gurudwara Sachkhand Board, Nanded. The contract period shall be **12 months from the date of Work Order.** The work includes supply of Interior & Exterior Paints, Lustre Paint, Enamel Paint, Primer, Wall Putty, and related materials. Approved brands shall be **Asian Paints, Berger, Nerolac, Birla Opus, Indigo,** or equivalent reputed make.

Brand selection shall be based on compliance with relevant **IS Codes**, technical specifications, quality, durability, coverage, finish, workability, and past performance. Manufacturer authorization, test certificates, and technical documents are mandatory. The department may call for sample **submission, shade cards, demo application, and on-site testing** before final approval of the brand. Interested bidders must have valid GST, PAN and experience in similar works, Firm Registration Certificate (if applicable), Manufacturer Authorization / Dealership Certificate, Experience Certificate / Work Orders of similar supply works, Product Data Sheets (PDS), Manufacturer Test Certificates, Material Safety Data Sheet (MSDS), Technical Specification Compliance Sheet, Latest Price List of Manufacturer.

Last Date for Submission: 05/05/2026 up to 5.00PM undersigned during office hours in favour of Superintendent Gurudwara Sachkhand Board, Nanded.

For any clarification or assistance, please contact **Superintendent** Gurudwara Sachkhand Board, Nanded and Engineering Section or through **Email:** contact@hazursahib.com

The authority reserves the right to accept or reject any tender without assigning any reason.

Superintendent
Gurudwara Sachkhand Board, Nanded

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांच्या टोळीला अटक; पिस्तूल, काडतूस व खंजर जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)** –स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहर व परिसरात पाहिजे आणि फरारी आरोपींच्या शोधात असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने कारवाई केली. यावेळी दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना अटक केली असून, त्यांच्याकडून एक पिस्तूल, दोन जिवंत काडतूस आणि एक खंजर जप्त केले आहे

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे व त्यांचे पथक दि. २७ एप्रिल रोजी रात्री ११ वाजल्यापासून ते दि. २८ एप्रिलच्या ५ वाजेपर्यंत नांदेड शहरात कोम्बिंग ऑपरेशनचे आयोजन करून अवैध पिस्तूल बाळगणाऱ्यांची माहिती काढून कारवाई करण्यात आली.

विठ्ठल घोगरे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना गोपनीय माहिती मिळाली की, काहीजण कामठा बाजार ते गाडेगाव रोडवर रेल्वे रुळाजवळील उड्डाण पुलाखाली संशयीत फिरत आहेत. त्यांचेकडे धारदार शस्त्र असण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून घटनास्थळी छापा कारवाई केली असता या घटनेत योगेश ऊर्फ गोट्या बंदर सोनकांबळे रा. हर्षनगर नांदेड, राहुल नागनाथ काळे रा. साठे चौक खोब्रागडे नगर नांदेड, राम ज्ञानेश्वर कांबळे रा. चिखलवाडी, मुदखेड, श्रावण रामजी जोंधळे रा. नवीन आबादी मुदखेड, मनोज साहेबराव कदम रा. मगनपुरा नवीन मोंढा नांदेड हे मिळून आले. त्यांना ताब्यात घेऊन त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यात एक गावठी पिस्तूल व एक जिवंत काडतूस, एक लोखंडी खंजर, एक लोखंडी गजाळी, दोरी, मिरची पाकीट, मोबाईल असा १ लाख ३२ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. या घटनेतील आरोपी हे दरोडा टाकण्याच्या पूर्वतयारीने मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवून मुद्देमालासह पुढील कारवाई कामी विमानतळ पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## किनवट तालुक्यातील १० ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुका शांततेत; आज मतमोजणी



**किनवट (प्रतिनिधी)** –तालुक्यातील १० ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी २७ मतदान केंद्रांवर शांततेत मतदान पार पडले. प्रशासनाच्या सुयोग्य नियोजनामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत, शांततामय आणि भयमुक्त वातावरणात पार पडली. कोणताही अनुचित प्रकार न घडता मतदान यशस्वीरीत्या पूर्ण झाले.

या पोटनिवडणुकांत कोठारी (सि.), खंबाळा, निराळा तांडा, पिंपळगाव (सिं.), सिंगोडा, सक्रु नाईक तांडा, टेंभी रायपूर, जरूर, कुपटी (खु.) आणि गोकुंदा या ग्रामपंचायतींमध्ये सरपंच व सदस्य पदांसाठी मतदान घेण्यात आले. उन्हाची तीव्रता असूनही मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शांततेत मतदानाचा हक्क बजावला.

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी डॉ. शारदा चोंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नायबतहसीलदार बालाजी फोले, अधिकारी निलेश राठोड, सहायक महसूल अधिकारी डी. सी. भुरे, लिंबेश राठोड, तलाठी विश्वास फड आदींनी विशेष परिश्रम घेतले. दरम्यान, मतमोजणी प्रक्रिया पाच फेऱ्यांत पार पडणार असून, बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजल्यापासून तहसील कार्यालयात मतमोजणी होणार आहे. त्यामुळे निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महादेव कोळी समाजाचा २८ वा विवाह सोहळा संपन्न



**अर्धापूर (प्रतिनिधी)** –तालुक्यातील निमगाव येथे आदिवासी महादेव कोळी समाजाचा जिल्हास्तरीय २८ वा सामूहिक विवाह मेळावा मंगळवार, दि.२८ रोजी पार पडला. या मेळाव्यात ७ जोडपी विवाहबद्ध झाली.

आदिवासी महादेव कोळी समाजाने लग्नामध्ये होणारा अनावश्यक खर्च टाळून विवाह सोहळ्यात आपल्या मुला-मुलींचे लग्न लावण्याची परंपरा सुरु ठेवली आहे. विवाहासाठी शेती विकणे, कर्ज काढणे यामुळे आदिवासी महादेव कोळी समाज दिवसेंदिवस कमकुवत व भूमिहीन होत चालला होता. या मेळाव्यामुळे वधूपित्याला मोठा दिलासा मिळाला आहे.

आदिवासी महादेव कोळींची मोठी लोकसंख्या असलेल्या अर्धापूर तालुक्यातील निमगाव येथील ज्येष्ठ मंडळी व ग्रामस्थांच्या संकल्पनेतून मागील पंचवीस वर्षांपासून सामुहिक विवाह सोहळ्याची परंपरा जोपासली जात आहे. या सामुहिक विवाह मेळाव्यात ७ लग्न लावण्यात आले. या कामी संयोजकांनी उत्कृष्ट नियोजन केले होते. विवाह सोहळ्यास गेल्या एका महिन्यापासून समाज बांधव व सर्वधर्मिय ग्रामस्थांनी भाग घेऊन मेळावा यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

या सामुहिक विवाह सोहळ्याला नांदेड कृऊबाचे सभापती संजय देशमुख लहानकर, उबाठाचे नांदेड जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, माजी जि. प. उपाध्यक्ष गंगाधर पाटील, भाजपाचे आनंदराव भंडारे चाभरेकर, नगरसेविका मीनलताई पाटील, उपशिक्षणाधिकारी शिवाजी नाईकवाडे, संचालक निळकंठ मदने, उपजिल्हा प्रमुख दत्ता पाटील, साहेबराव हट्टेकर, रूपेश देशमुख, शंकर हापगुंडे, माजी सरपंच डॉ.राजेश बाजगिरे, सुनिल लोहकरे, नामदेव दुधाटे, नागोराव भांगे, चंद्रमुनी लोणे, लक्ष्मीकांत मुळे, गोविंद टेकाळे, रामराव भालेराव, सखाराम क्षीरसागर, गुणवंत विरकर, गंगाधर सोनटक्के, बंटी राठोड, दगडूजी काकडे, राजू सितापराव, विठ्ठल काकडे, बिभीषण नरोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



**नांदेड** – नांदेड वाघाळा महानगरपालिका कर्मचारी युनियनद्वारे घनकचरा व्यवस्थापन काम करणाऱ्या कामगारांवर झालेल्या अन्यायाविरोधात मुंडन आंदोलन करण्यात आले. यावेळी गणेश शिंगे, माधव लाड, बालाजी साबणे तसेच युनियनचे सर्व पदाधिकारी, सदस्य व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस, नांदेड)

## पीएच. डी. कोर्सवर्क उन्हाळी २०२६ परीक्षेसाठी अर्ज स्वीकृती प्रक्रिया सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संकुल व संशोधन केंद्रांतील पीएच.डी. कोर्सवर्क अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी २०२६ परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार ऑफलाईन व लेखी स्वरूपात घेण्यात येणार असून संबंधित विद्यार्थ्यांनी आपली परीक्षा अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज आपल्या संबंधित संशोधन केंद्र किंवा संकुल येथे सादर करावेत. परीक्षा शुल्क रुपये ३१०/- इतके निश्चित करण्यात आले आहे. अर्ज स्वीकृतीचा कालावधी ४ ते ७ मे २०२६ असा आहे. संशोधन केंद्रांनी परीक्षा अर्जाचे शुल्क धनादेश/RTGS/NEFT द्वारे लेखाधिकारी, स्वारातीम विद्यापीठ, नांदेड यांच्या नावे आयडीबीआय बँक, लाहोटी कॉम्प्लेक्स, वजीराबाद नांदेड येथील खाते क्रमांक -०५००१०४००००२८४२२ या खात्यावर जमा करावे. संबंधित IFSC कोड IBKL०००००५०० आहे. शुल्क भरण्याची अंतिम तारीख ८ मे २०२६ असून, संशोधन केंद्रांनी अर्ज व शुल्कासह परीक्षा विभागात सादर करण्याची अंतिम मुदत ११ मे २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

सर्व संबंधित विद्यार्थी, संशोधक व मार्गदर्शकांनी वरील सूचनांचे पालन करून निर्धारित कालावधीत प्रक्रिया पूर्ण करावी, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

## प्रवीण चिखलीकर यांच्या हस्ते बंधाऱ्याचे भूमिपूजन



**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील आडगाव येथे युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते ५६ लक्ष रुपयांच्या बंधाऱ्याचे भूमिपूजन करण्यात आले. या बंधाऱ्यामुळे भूजल पातळीत वाढ होईल. तसेच पाणी अडविले जाईल. त्याचा शेतीसाठी उपयोग होणार आहे, असे प्रवीण पाटील चिखलीकर यांनी सांगितले.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आपल्या मतदारसंघात सिंचन क्षेत्र वाढावे यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. पाटबंधारे तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत त्यांनी मागील महिन्यापूर्वी बैठक घेतली. नाला सरळीकरण, लोहा शहरातून वाहणाऱ्या नदीचे खोलीकरण, सिमेंट, दगडी, माती बंधारे तसेच कृषी विभागाकडून छोटे चर, जलयुक्तमध्ये कामे काय घेता येतील याबाबत सविस्तर चर्चा केली व अडीअडचणी जाणून घेतल्या. तसेच काही तांत्रिक अडचणी दूर केल्या.

यावेळी कामांच्या मान्यतेचे अंदाजपत्रक तयार करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या. लोहा तालुक्यातील आडगाव येथे लघु पाटबंधारे विभागाच्या वतीने ५६ लक्ष रुपयांच्या साठवण सिमेंट बंधाऱ्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. माजी पं. स. सदस्य दता वाले. सरपंच मंगेश क्षीरसागर, इजि. माधव पाटील चितळीकर, शासकीय तालुकास्तरीय बांधकाम समिती सदस्य अर्जुन राठोड, माजी सरपंच लक्ष्मण वाले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## तिरुपती-अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेस सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्यां-मधील रेल्वे संपर्क अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने रेल्वे बोर्डाने गाडी क्रमांक १७४२९/१७४३० तिरुपती-अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्स्प्रेस सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. ही गाडी विद्यमान विशेष गाडीच्या ऐवजी नियमित साप्ताहिक सेवेच्या स्वरूपात धावेल.

गाडी क्र. १७४३० अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्स्प्रेस प्रत्येक रविवारी अकोला येथून सुटेल आणि सोमवारी तिरुपती येथे पोहोचेल. ही सेवा ३ मे २०२६ पासून सुरू होईल. गाडी क्र. १७४२९ तिरुपती-अकोला साप्ताहिक एक्स्प्रेस प्रत्येक शुक्रवारी तिरुपती येथून सुटेल आणि शनिवार रोजी अकोला येथे पोहोचेल. ही सेवा ८ मे २०२६ पासून सुरू होईल.

ही नवीन साप्ताहिक सेवा विदर्भ आणि मराठवाडा भागातील प्रवाशांना मोठा लाभ देणार असून, तेलंगणा व आंध्र प्रदेशातील महत्त्वाच्या ठिकाणांशी, विशेषतः तिरुपती या तीर्थक्षेत्राशी थेट संपर्क उपलब्ध करून देईल. तसेच यात्रेकरू, विद्यार्थी, व्यापारी व सर्वसामान्य प्रवाशांसाठीही ही सेवा सोयीची ठरेल. गाडी क्र. १७४३० अकोला-तिरुपती एक्सप्रेस (रविवार) अकोला येथून सकाळी ८:१० वाजता सुटेल व मार्गातील महत्त्वाच्या स्थानकांवर पुढीलप्रमाणे थांबे देईल: वाशिम (९:१५), हिंगोली (०९:५५), वसमत (१०:४५), पूर्णा (११:५०), हजूर साहेब नांदेड (१२:२५), धर्माबाद (१३:५०), बासर (१४:०७), काचिगुडा (१७:४०), कर्नूल टाउन (२१:४२) आणि तिरुपती येथे सोमवार रोजी ८:३० वाजता पोहोचेल. गाडी क्र. १७४२९ तिरुपती-अकोला एक्सप्रेस (शुक्रवार) तिरुपती येथून दुपारी १२:२५ वाजता सुटेल व मार्गातील महत्त्वाच्या स्थानकांवर पुढीलप्रमाणे थांबे देईल: कर्नूल टाउन (२१:२०), काचिगुडा (२:००), निजामाबाद (६:००), बासर (६:४२), धर्माबाद (७:००), हजूर साहेब नांदेड (०८:४०), पूर्णा (९:४०), वसमत (१०:१०), हिंगोली (११), वाशिम (११:५५) आणि अकोला येथे शनिवार रोजी दोन वाजता पोहोचेल. अकोला, वाशिम, हिंगोली, बासमत आणि नांदेड येथील प्रवाशांना या नव्या सेवेचा विशेष लाभ होणार आहे.

## भाग्यनगर आणि उस्माननगर ठाण्याच्या हद्दीत घरफोडीच्या घटना

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील भाग्यनगर व कंधार तालुक्यातील उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीच्या घटना घडल्या आहेत. या दोन्ही घरफोडीमध्ये जवळपास पाच लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला असून, अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या लईजाईनगरी भागात रोकडेश्वर संजीवराव नरवाडे यांच्या बहिणीचे घर आहे. त्या आपल्या घराला कुलूप लावून कुटुंबासह बाहेरगावी गेल्या असता २१ एप्रिल ते २५ एप्रिलच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांचे घर फोडून कपाटातील ७० हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. रोकडेश्वर नरवाडे यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक केजगीर करीत आहेत.

तसेच दुसऱ्या घरफोडीच्या घटनेत उस्माननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोहा तालुक्यातील मंगलसांगवी येथील मारुती महाजन कदम यांचे व त्यांच्या शेजाऱ्यांचे घर फोडून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने व नगदी असा तीन लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना २६ एप्रिल ते २७ एप्रिलच्या दरम्यान घडली. मारुती कदम यांच्या फिर्यादीवरून उस्माननगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिक वापरास सक्त मनाई

### ध्वजसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –राष्ट्रीय कार्यक्रम, महत्त्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम आदी समारंभाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचा वापर करताना, भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापरण्यात येऊ नयेत. यासाठी सर्व शासकीय यंत्रणांसह शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटना आदींसह नागरिकांनी दक्ष राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

दरवर्षी २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे तसेच मराठवाड्यात १७ सप्टेंबर आणि इतर राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा सामन्यांच्यावेळी विद्यार्थी व नागरिकांकडून राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. अशा कार्यक्रमात प्लास्टिकचे ध्वज वापरल्याने, कार्यक्रमानंतर फाटलेले कागदी तसेच प्लास्टिकचे ध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले असतात, पायदळी तुडविले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. राष्ट्रध्वजाचा उचित सन्मान राखण्यासाठी भारतीय ध्वजसंहितेच्या कलम १.२ ते १.५ मध्ये राष्ट्रध्वजाच्या उचित वापराबाबत स्पष्ट तरतूद आहे. ध्वजसंहितेच्या कलम २.२ (x) मधील प्रयोजनासाठीच कागदी राष्ट्रध्वज वापरता येतो.



प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत ध्वजसंहितेमध्ये उल्लेख नमूद नाही. याचा विचार करता ध्वजसंहितेच्या तरतुदींचे पालन करावे. तसेच कोणीही प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर करु नये.

प्लास्टिक व कागदी राष्ट्रध्वजांचा वापर थांबविण्या-साठी जनजागृती करण्याकरिता जिल्हा व तालुका पातळीवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. कार्यक्रम पार पडल्यानंतर खराब झालेले, माती लागलेले राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले राष्ट्रध्वज गोळा करुन ते तालुका व जिल्हा स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या यंत्रणेस सुपूर्द करण्याचे अधिकार अशासकीय संस्था तसेच इतर संघटनांना देण्यात आले आहेत. त्यांनी असे खराब झालेले, माती लागलेले ध्वज जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याकडे सुपूर्द करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी सुपूर्द केले असे ध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधून शिवून बंद करावे. अशाप्रकारे बांधलेले राष्ट्रध्वज सन्मानपूर्वक नष्ट करण्याबाबत परिपत्रकात व ध्वजसंहितेत स्पष्ट सूचना आहेत. त्यानुसार खराब झालेल्या ध्वजाची विल्हेवाट लावण्यासाठी तालुका व जिल्हा पातळीवर केलेल्या उपरोक्त व्यवस्थेबाबत सर्व शासकीय कार्यालये, अर्धशासकीय कार्यालये, स्थानिक प्राधिकरणे व शैक्षणिक संस्था यांनी योग्य ती दखल घ्यावी व कार्यवाही करावी, असेही गृह विभागाने म्हटले आहे.

## सेवा हक्क दिनी ५ ग्रा.पं. अधिकाऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव

**अर्धापूर (प्रतिनिधी)** –सेवा हक्क दिनानिमित्त जिल्ह्यातील उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आला.

प्रशासनाच्या वतीने २८ एप्रिल सेवा हक्क दिन साजरा करण्यात आला. आपले सरकार सेवा केंद्र अंतर्गत ग्रामपंचायत संगणक चालकांच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावरील विविध दाखले व प्रमाणपत्रे जलदगतीने उपलब्ध करून देण्यात या अधिकाऱ्यांनी मोलाची भूमिका बजावली. संगणक चालकांच्या समन्वयातून तंत्रज्ञानाचा वापर करीत प्रशासकीय सेवा लोकांपर्यंत पोहोचवल्याबद्दल जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) दत्तात्रय गिरी यांच्या हस्ते



रवी क्षीरसागर, अर्धापूर तालुक्यातील लहान ग्रा.पं.चे अधिकारी दत्ता करपे, हदगाव तालुक्यातील मनाठाचे ग्रा.पं. अधिकारी, वाघी ग्रा.पं. अधिकारी गोपाल टोकले, डोल्हारी ग्रा.पं. अधिकारी एस. बी. श्रीमनवार, राज तोटावार ग्रा.पं.अधिकारी नरंगल बु. यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी गटविकास अधिकारी यू. डी. तोटावाड, विस्तार अधिकारी पी. एन. गर्जे, कृषी विस्तार अधिकारी रमाकांत नावंदे, आरोग्य विस्तार अधिकारी एस. पी. गोखले, नरसिंग सूर्यवंशी आदींनी यशस्वी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com